सेव्हींग व करंट खात्यांवर मिळवा 7% व्याजदर
दि जैन मर्चन्ट्स को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
इशस्त कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900
श्री. संजय काठेड Mo. 9372444001



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी.. विश्वसनीय व नामांकित पेढी...
HB Since 1935
वै. हरी बाळाजी देडगांवकर
सराफ अँण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.



रजि नं. १९४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रुपये | अहिल्यानगर, शनिवार दि. १०.१०.२०२६ | अंक नं. १६३ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020



घट स्थापना
नारी शक्तीला वंदन करण्याच्या शारदीय नवरात्रोत्सवात
आमच्या लाडक्या ग्राहक भगिनींच्या
अधिक सौंदर्यवृद्धीसाठी आम्हीही स्थापन करीत आहोत...
प्रथमच ४ हजार स्क्वे.फुटाचे प्रशस्त वातानुकुलित
भव्य कॉस्मेटिक्स् शोरुम



लवकरच नव्या प्रशस्त जागेत रुपांतर
'' सारडा लेन'' येथे..
महावीर कॉस्मेटिक्स्
मोची गल्ली, अहिल्यानगर.
Dishan



यंदाची सुवर्णखरेदी — दिवाळी धमाका ऑफर — भरघोस फायद्याची..
₹999/- प्रतीग्रॅम मजुरी (22 कॅरेट सर्व दागिन्यांची)
+
₹111/- चांदी चक्क फ्री (प्रतीग्रॅम सोने खरेदीवर)
सोनेखरेदीवर लकी ड्रॉ कुपनव्दारे
11 एलईडी टिव्ही (43") जिंकण्याची सुसंधी* (प्रती एक ग्रॅम एक लकी कुपन.)
ऑफर कालावधी – 11 ऑक्टोबर 2026 ते 30 डिसेंबर 2026 पर्यंत वैध
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02



2014 पासुन आपल्या सेवेत..सोनेरी नातं..



ना नफा ना तोटा पहिली तीन वर्ष.. कृपया त्याचा फायदा घ्या
कृपया जवळच्या किराणा ड्रायफ्रुट दुकानदारांना संपर्क करा
10 किलो मागे 1 मोठी पिशवी फ्री..फ्री..
रत्नकमल चहा
ब्रँडेड कंपनीचा चहा व
रत्नकमल चहा
एक वेळेस जरुर तुलना करुन पहा
आशिष ट्रेडर्स चहा पावडरचे ठोक व किरकोळ विक्रेते
रत्नकमल, बुरूड गल्ली, मारुती मंदिरासमोर, अहिल्यानगर- ४१४००१
Contact : 8767369367
इतर कंपन्या पेक्षा 50 ते 70 रुपये कमी किलो मागे
स्वस्त दर्जा त्यापेक्षाही उत्तम.





उच्च दर्जा.. योग्य किंमत..
हिच तर आमची खासियत..
Available In Top Brands
Hettich HÄFELE
GRASS blum
ITALICA ebco
NEW BOMBAY Since 1972
KITCHENS & WARDROBE
Ahilyanagar Off.: Excel Arcade, Near HDF Bank, Laltaki, Ahilynagar.
Pune Off.: 1, Patil Plaza, Mitra Mandal Chowk, Pune.
Cell.: 98909 85601 | 96222 94670.



GULATI MOTORS
Authorised Dealer of Ashok Leyland LCV
ASHOK LEYLAND Koi Manzil Door Nahin
शुभ लाभ शक्ती ऑफर
या दसरा, दिवाळीत व्यवसायाला द्या नवी दिशा
प्रत्येक खरेदीवर मिळणार दोन्ही पैकी एक निश्चित भेटवस्तू!



निश्चित भेटवस्तू*
नियम आणि अटी लागू



जास्त पॉवर
जास्त टॉर्क
जास्त पेलोड
इंडस्ट्रीमध्ये प्रथमच 5 वर्ष* किंवा 2 लाख किमी वॉरंटी
मोठा लोडिंग एरिया
मोठी लोड बॉडी
मोठा टायर साईज
– अधिक माहिती करिता संपर्क करा –
9130090018 | 9156260244
शोरूम : अहिल्यानगर | संगमनेर | श्रीरामपूर | सुपा



GANDHI
HOUSE OF JEWELS
By Gandhi Jewellers (Pabalwala)
गांधी ज्वेलर्स पाबळवाला
लवकरच येत आहे **अहिल्यानगर** येथे... सुंदर दागिन्यांचा आकर्षक नजराणा घेऊन!
आकर्षक आभूषणांचे
भव्य प्रदर्शन
12, 13 आणि 14 ऑक्टोबर
हॉटेल आयरिस प्रीमिअर, अहिल्यानगर
मेकिंग चार्जेस फक्त 7% पासून चालू
उद्घाटन शुभारंभ
12 ऑक्टोबर सकाळी 10:30 वाजता
शुभहस्ते



सौ. धनश्रीजी सुजयजी विखे पाटील
सौ. शीतलजी संग्रामजी जगताप
डॉ. सौ. कल्याणीजी चौधरी



डॉ. सौ. ज्योत्सनाजी डौले
सौ. मंजूजी सुनिलजी मुनोत
प्रमुख उपस्थिती
सौ. सुधाजी कांकरिया
सौ. प्राचीजी पाटील
सौ. साधनाजी कांकरिया
सौ.सविताजी कांकरिया
सौ. मनिशाजी लोढा
सौ. हेमाजी शेलोत
लग्नसराईपासून सण-समारंभापर्यंत... प्रत्येक प्रसंगासाठी खास दागिन्यांचे
आकर्षक कलेक्शन अनुभवण्यासाठी अवश्य भेट द्या.
558, सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणे | 92255 84990 / 80555 60222

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## 'पाच वर्षं आणि आपल्या गुंतवणुकीचा प्रवास'



राजन कुटे

पाच वर्षं कमी वाटतात पण गुंतवणूकदारासाठी ती खूप मोठी असू शकतात. मार्केटच्या इतिहासाकडे पाहिलं तर पाच वर्षं फार मोठा काळ वाटत नाही. पण त्या पाच वर्षांत गुंतवणूक करून बसलेल्या व्यक्तीला मात्र तो काळ खूप मोठा वाटू शकतो. विशेषतः जेव्हा आपली गुंतवणूक फारशी पुढे गेलेली दिसत नाही.

कधी कधी मार्केट बराच काळ कमी-जास्त होत राहतं. मोठी घसरणही होत नाही आणि मोठी वाढही होत नाही. परतावा अपेक्षेप्रमाणे मिळत नाही. अशा वेळी संयम ठेवणं कठीण होतं. मनात प्रश्न येतो-आपण अजून किती दिवस थांबायचं? पण गंमत अशी आहे की, अशाच काळात पुढच्या संधींची तयारी होत असते. भारतीय बाजार सध्या अशाच एका महत्त्वाच्या टप्प्यावर आहे असं म्हणता येईल. अलीकडची कमजोरी आपल्याला काय सांगते?

मार्केट खाली आलं की आपला पहिला प्रश्न असतो-आता अजून किती खाली जाणार? पण कदाचित त्यापेक्षा महत्त्वाचा प्रश्न वेगळा आहे-किंमत आणि त्या कंपनीच्या खऱ्या मूल्यामध्ये आता काही बदल झाला आहे का? कारण प्रत्येक घसरण एकसारखी नसते. काही कंपन्यांच्या व्यवसायात खरंच अडचणी आलेल्या असू शकतात. काही कंपन्यांना तात्पुरता त्रास होत असू शकतो. आणि काही चांगल्या कंपन्या अशाही असू शकतात, ज्यांचा व्यवसाय पूर्वीसारखाच चांगला आहे; फक्त त्यांची किंमत आधी खूप जास्त झाली होती. आता त्या किमती काही प्रमाणात खाली आल्या असतील, तर त्यांच्याकडे पुन्हा नव्याने पाहण्याची वेळ येऊ शकते. याचा अर्थ लगेच खरेदी करायची असा नाही. पण आता पुन्हा नीट पाहायला हवं एवढं नक्की.

**चांगली कंपनी स्वस्त होणं म्हणजे काय?**

समजा, आपल्याला एखादी चांगली कंपनी अनेक वर्षांपासून आवडते. तिचा व्यवसाय चांगला आहे. व्यवस्थापन विश्वासार्ह आहे. कंपनी कमाई करत आहे. पुढे वाढण्याची क्षमताही आहे. पण तिच्या शेअरची किंमत इतकी वाढलेली आहे की त्या किमतीला गुंतवणूक करणं फारसं योग्य वाटत नाही. मग आपण थांबतो. काही वर्षं जातात. कंपनीचा व्यवसाय वाढत राहतो. पण शेअरची किंमत फारशी वाढत नाही. हळूहळू कंपनीची कमाई आणि तिची बाजारातील किंमत यांच्यातला फरक कमी होऊ लागतो. आणि एक दिवस असं जाणवतं-अरे, हीच कंपनी आधी खूप महाग वाटत होती. आता मात्र किंमत जरा विचार करण्यासारखी वाटते. हीच गोष्ट महत्त्वाची आहे.

किंमत खाली आली म्हणून संधी निर्माण होत नाही. चांगल्या व्यवसायाची किंमत त्याच्या भविष्यातील क्षमतेच्या तुलनेत अधिक योग्य झाली, तर संधी निर्माण होऊ शकते. आणि इथे संयमाचं महत्त्व वाढतं गुंतवणुकीत एक गंमत आहे. ज्या काळात संयमाची सर्वात जास्त गरज असते, त्याच काळात संयम ठेवणं सर्वात कठीण असतं. मार्केट वर जात असताना गुंतवणूक करून बसणं सोपं असतं. सगळीकडे संपत्ती निर्माण करण्याच्या गोष्टी सुरू असतात. आपल्या पोर्टफोलिओमध्येही वाढ दिसत असते.

पण जेव्हा काही महिने, कधी काही वर्षं, फारसा परतावा मिळत नाही तेव्हा मन अस्वस्थ होतं. मग आपल्याला वाटतं-दुसरा शेअर घ्यावा का? दुसरा फंड घ्यावा का? दुसरी strategy वापरावी का? काहीतरी वेगळं करावं का? आणि कधी कधी आपण गुंतवणुकीतून बाहेर पडतो. कारण आपली मूळ गुंतवणूक चुकीची होती म्हणून नाही; तर वाट पाहणं कंटाळवाणं आणि अस्वस्थ करणारं झालं म्हणून. इथेच गुंतवणूकदाराचं वर्तन महत्त्वाचं ठरतं. आपल्याला पुढचा तेजीचा टप्पा नेमका कधी सुरू होईल हे माहीत असण्याची गरज नाही. ते कुणालाच निश्चितपणे माहीत नसतं. पण आपल्याला एवढं नक्की माहीत असायला हवं-आपण काय घेतलं आहे? ते का घेतलं आहे? त्या गुंतवणुकीमागचा विचार अजूनही योग्य आहे का? आणि आपल्याला किती काळासाठी पैसे गुंतवायचे आहेत? मग ही पाच वर्षं वाया गेली का? परतावा कमी मिळाला की आपल्याला अनेकदा वाटतं-आपला वेळ वाया गेला. पण मार्केट नेहमी सरळ रेषेत पुढे जात नाही. कधी कधी बराच काळ काही विशेष घडत नाही. कंपन्या आपला व्यवसाय वाढवत असतात. कमाई वाढत असते. किमती मात्र तितक्या वेगाने वाढत नाहीत. आणि मग एखाद्या टप्प्यावर व्यवसायाची वाढ, योग्य किंमत आणि गुंतवणूकदारांचा विश्वास या तीन गोष्टी एकत्र येऊ शकतात. तेव्हा चित्र अचानक बदलल्यासारखं दिसतं.

पण तो बदल अचानक झालेला नसतो. त्याची तयारी आधीपासून सुरू असते. म्हणूनच दीर्घकालीन गुंतवणुकीचा अर्थ पुढची तेजी कधी येईल हे ओळखणं नाही. त्याचा अर्थ आहे-आपण काय घेतलं आहे हे समजून घेणं आणि योग्य कारण असेपर्यंत त्याला वेळ देणं. आजचा बाजार त्यामुळे लक्ष देण्यासारखा आहे.

याचा अर्थ बाजार आता नक्की वाढणार आहे असा नाही. प्रत्येक घसरण म्हणजे संधीच असते असंही नाही. पण बराच काळ चाललेली कमजोरी काही वेळा बाजारातील जास्तीच्या किमती कमी करू शकते आणि चांगल्या कंपन्यांकडे पुन्हा अधिक समजूतदार किमतीत पाहण्याची संधी देऊ शकते. बाजारात अनिश्चितता कायम राहणार आहे. पुढचे काही महिनेही सहज असतीलच असं नाही. पण एक गोष्ट लक्षात ठेवायला हरकत नाही-अनिश्चितता आणि संधी अनेकदा एकाच वेळी असतात. आपलं काम अनिश्चितता संपवणं नाही. आपलं काम एवढंच-त्या अनिश्चिततेमुळे निर्माण झालेल्या किमतीत काही खरंच विचार करण्यासारखं आहे का, हे शांतपणे पाहणं.

शेवटी, दीर्घकालीन गुंतवणुकीत कमाई करण्याइतकंच महत्त्वाचं काही असेल, तर ते म्हणजे योग्य वेळी घाई न करणं. कधी कधी compounding ची खरी ताकद जास्त कमावण्यात नसते; तर वेळेला आपलं काम करण्याइतका संयम ठेवण्यात असते. प्रत्येकाला बाजार आणि प्रत्येक गुंतवणुकीकडे इतकं लक्ष देणं शक्य असेलच असं नाही. अशा वेळी गुंतवणूक-उत्पादन निवडताना जाणकार व्यक्तीची मदत घेणं अधिक संयुक्तिक ठरेल.

स्पष्ट ठेवा, शांत ठेवा.

- **राजन कुटे,** अँफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# कंपनीच्या डिव्हीजन प्रेसिडेंटच्या नावाने बनावट ग्रुप तयार करून बँक खात्यातून सुमारे १ कोटी रुपयांची 'ऑनलाइन फसवणूक'

### नगरच्या सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर - नगर शहरात सायबर गुन्हेगारांनी एका नामांकित कंपनीच्या डिव्हीजन प्रेसिडेंटच्या नावाने बनावट ग्रुप तयार करून ग्रुपवर स्वतःला कंपनीचे अध्यक्ष असल्याचे भासवून कंपनीच्या खात्यातून तब्बल १ कोटी रुपये त्याने दिलेल्या बँक खात्यावर पाठवायला लावून ऑनलाइन फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी नगरच्या सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत कंपनीचे समीर शरद पळसकर (वय ४६, रा. नारायणी रो-बंगलो नं. २, श्रीराम, ओरा टॉवर समोर, तपोवन रोड, सावेडी, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. ८ ऑक्टोबर रोजी दुपारी १.४३ वाजेपासून ते त्याच दिवशी रात्री २.२२ वाजेच्या दरम्यान हा सायबर फसवणुकीचा प्रकार घडला. अज्ञात आरोपीने 'मायक्रोसॉफ्ट टीम्स' या प्लॅटफॉर्मवर कंपनीचे डिव्हिजन प्रेसिडेंट सुनील मुरलीधरन यांच्या नावाने एक बनावट अकाउंट तयार केले. त्यानंतर आरोपीने कंपनीचे एचआर मॅनेजर शैलेन्द्र खळदकर व कंपनीचे वरिष्ठ लेखापाल सुयोग बनसाळी यांना या ग्रुपमध्ये समाविष्ट केले. स्वतःच कंपनीचे अध्यक्ष असल्याचे भासवून आरोपीने सुयोग बनसाळी यांना एका बँक खात्यावर तब्बल १ कोटी रुपयांचे पेमेंट पाठवण्यास भाग पाडले.

भविष्यात कंपनीच्या कामासाठी हा पैसा ट्रान्सफर करायचा आहे असे भासवून आरोपींनी एक कोटी रुपयांची ही मोठी रक्कम एका अज्ञात बँक खात्यावर वळती करून घेतली. रक्कम वर्ग झाल्यानंतर कंपनीची फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादीने ९ ऑक्टोबर रोजी तत्काळ नगरच्या सायबर पोलीस ठाण्यात जावून फिर्याद नोंदवली. या फिर्यादी वरून सायबर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८ (४), ३१९ (२) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (सी), ६६ (डी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आली आहे.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार राघवेंद्र भालसिंग या डिजिटल फसवणुकीमागच्या मूळ सूत्रधारांपर्यंत पोहोचण्यासाठी कसून तपास करत आहेत.

## काँग्रेसच्या नगर ग्रामीण तालुकाध्यक्षपदी भरत बोडखे



नगर - महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने अहिल्यानगर दक्षिण ग्रामीण जिल्हा कमिटीअंतर्गत १२ ब्लॉक अध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. यामध्ये अहिल्यानगर ग्रामीण तालुका अध्यक्षपदी भरत बोडखे यांची निवड करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या मान्यतेने या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र प्रदेश कमिटीचे वरिष्ठ उपाध्यक्ष अ‍ॅड. गणेश पाटील यांच्या स्वाक्षरीने नियुक्त्यांबाबतचे पत्र जारी करण्यात आले आहे. या अहिल्यानगर ग्रामीण तालुक्याची जबाबदारी भरत बोडखे यांच्याकडे सोपविण्यात आल्याने त्यांच्या नियुक्तीने काँग्रेस पक्षाची ग्रामीण भागात संघटनात्मक बांधणी करण्याची जबाबदारी त्यांच्या कडे असणार आहे.

# शहर पाणी योजनेचा विज पुरवठा खंडीत झाल्याने नगरच्या उपनगरी भागाचा पाणी पुरवठा विस्कळीत

नगर - महापालिकेच्या शहर पाणीपुरवठा योजनेच्या मुळानगर पंपिंग स्टेशन येथील महावितरणच्या उपकेंद्रातील वायर १० ऑक्टोबर रोजी सकाळी अचानक आग लागून जळाली आहे. त्यामुळे विज पुरवठा खंडीत होवून योजनेचा पाणी उपसा बंद पडला. परिणामी सर्व उपनगरी भागाचा पाणी पुरवठा विस्कळीत झाला आहे.

शहर पाणी पुरवठा योजनेच्या मुळानगर पंपीग स्टेशन येथे महावितरणचे ३३ केव्ही उपकेंद्र आहे. त्यामध्ये १० ऑक्टोबर रोजी सकाळी ११.३० च्या सुमारास अचानक तांत्रिक बिघाड निर्माण होवून केबल जळाल्याने विज पुरवठा खंडीत झाला होता. विज पुरवठा खंडीत झाल्याने व त्यामुळे पाणी उपसा बंद पडल्याने तातडीने महावितरणचे कर्मचारी यांना बोलावून दुरुस्तीचे काम करून दुपारी १२.३० वाजता विज पुरवठा सुरु करून घेतला. त्यानंतर मुळानगर येथुन बंद पडलेला पाणी उपसा टप्प्याटप्प्याने सुरु करण्यात येत आहे. परंतु उपनगरांचे पाणी वाटपाच्या वेळेतच विज पुरवठा खंडीत झाल्याने व त्यामुळे पाणी उपसा बंद पडल्याने सर्व उपनगरी भागास उशीराने व कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे.

तरी नागरीकांनी याची नोंद घेवून असलेल्या पाण्याचा वापर काटकसरीने करून सहकार्य करावे असे आवाहन महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# बोल्हेगाव येथे भरदिवसा घरात घुसून महिलेला चाकूचा धाक दाखवत चोरी

### १ लाख ३४ हजारांचे सोन्याचे दागिने, रोख रक्कम व २ मोबाईल दोघांनी केले लंपास

नगर - बोल्हेगाव येथील भोरमळा परिसरात घरात एकट्या असलेल्या महिलेला गळा दाबून आणि चाकूचा धाक दाखवून दोन अज्ञात भामट्यांनी १ लाख ३४ हजार रुपयांचा ऐवज जबरीने लुटून नेल्याची घटना ९ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सौ. सुनिता कैलास तुपे (वय ५४, रा. भोरमळा, बोल्हेगाव, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. ९ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी सुनिता तुपे या आपल्या घरात एकट्या झोपलेल्या असताना दोन अनोळखी इसम घरात घुसले. त्यापैकी एकाने फिर्यादीचा गळा दाबून त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मणी मंगळसूत्र व इतर दागिने जबरदस्तीने ओढून घेतले. त्याचवेळी दुसऱ्या अनोळखी इसमाने चाकूचा धाक दाखवून फिर्यादीच्या कानातील टाप्स व साखळी ओढून घेतली. त्यानंतर भामट्यांनी घरातील कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने, रोख रक्कम व मोबाईल असा मुद्देमाल चोरून पोबारा केला.

या लुटमारीत चोरट्यांनी ३० हजार रुपये किमतीचे दीड तोळा वजनाचे सोन्याचे मणी मंगळसूत्र, २० हजार रुपये किमतीचे सोन्याचे कानातील टाप्स व साखळ्या, ५० हजार रुपये किमतीचे कपाटातील अडीच तोळा वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र, १० हजार रुपये किमतीची अर्धा तोळा वजनाची सोन्याची अंगठी, एक ओप्पो कंपनीचा मोबाईल, एक रेडमी कंपनीचा मोबाईल आणि कपाटात ठेवलेली १६ हजार रुपयांची रोख रक्कम (५०० रुपयांच्या ३२ नोटा) असा एकूण १ लाख ३४ हजार रुपयांचा मुद्देमाल बळजबरीने चोरून नेला.

या घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे, तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य, सहायक पोलीस निरीक्षक प्रदीप एकशिंगे आणि पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर यांनी घटनास्थळी व रुग्णालयात धाव घेऊन पाहणी केली. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात दोन अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०९(४), ३११, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक प्रदीप एकशिंगे करत असून, आरोपींच्या शोधासाठी पोलिसांचे पथक रवाना झाले आहे.

# रात्रीच्या अंधारात जिल्ह्यात सुरु होते अनेक 'कृष्णकृत्ये' पोलिसांनी 'ऑपरेशन ऑल आऊट' राबवत केला पर्दापाश

नगर - अहिल्यानगर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि गुन्हेगारीवर वचक बसवण्यासाठी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार संपूर्ण जिल्ह्यात विशेष 'ऑपरेशन ऑल आऊट' राबविण्यात आले. ९ ऑक्टोबर रोजी रात्री ११ वाजेपासून ते १० ऑक्टोबर रोजी पहाटे ५ वाजेच्या दरम्यान हे कोम्बिंग ऑपरेशन आणि नाकाबंदी मोहीम राबविण्यात आली.

या ऑल आऊट ऑपरेशन दरम्यान सर्व पोलीस ठाण्यांच्या हद्दीत कडक नाकाबंदी लावून वाहनांची कसून तपासणी करण्यात आली. यात ड्रंक अ‍ॅण्ड ड्राईव्ह, फरार व पाहिजे असलेले आरोपी, हद्दपार केलेले गुन्हेगार, नॉन बेलेबल वॉरंटमधील आरोपी आणि हिस्ट्रीशीटर गुन्हेगारांचे चेकिंग करण्यात आले. तसेच अवैध अग्निशस्त्रे बाळगणाऱ्या आणि अवैध धंदे चालवणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले होते. या मोहिमेत जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी आणि अंमलदार मिळून एकूण ५७ पोलीस अधिकारी, २०७ पोलीस अंमलदार आणि १०१ होमगार्ड प्रत्यक्ष रस्त्यावर उतरले होते.

या रात्रभर चाललेल्या मोहिमेत पोलिसांनी ११३६ वाहनांची तपासणी केली, ज्यामध्ये वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २२६ वाहनांवर दंडात्मक केसेस करण्यात आल्या, तर ड्रंक अ‍ॅण्ड ड्राईव्हच्या १२ केसेस नोंदवण्यात आल्या. तपासणी दरम्यान ५० हद्दपार आरोपींची पाहणी करण्यात आली, ८२ जणांवर नॉन बेलेबल वॉरंटची बजावणी करण्यात आली, २५५ हॉटेल व लॉजिंगची झाडाझडती घेण्यात आली, तसेच १५९ सराईत गुन्हेगारांची प्रत्यक्ष चेकिंग करण्यात आली. याशिवाय अवैध धंद्यांवर छापा टाकून २३ ठिकाणी कारवाई करण्यात आली. विशेष मोहिमेअंतर्गत अभिलेखावरील २० फरार आरोपी आणि ३६ पाहिजे असलेल्या आरोपींचा निपटारा करून त्यांचे नाव दप्तरावरून कमी करण्यात आले. ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि श्रीरामपूरचे अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी व पोलीस अंमलदारांनी पार पाडली.

## बबनराव आंबेकर यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - पारगल्ली माळीवाडा येथील बबनराव काशिनाथ आंबेकर (वय ७०) यांचे १० ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. विष्णू व महेश आंबेकर यांचे ते वडील होत.

## छगन राऊत यांचे अल्पश आजाराने निधन

नगर - बालिकाश्रम रोड धर्माधिकारी मळा येथील रहिवासी



छगन तुकाराम राऊत (वय ५४) यांचे १० ऑक्टोबर रोजी पहाटे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. अहिल्यानगर येथील श्री रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडिट सोसायटी मध्ये गेली ३० वर्ष ते वसुली अधिकारी म्हणून काम पाहत होते. त्यांचे मागे पत्नी, दोन मुले, आई, तीन भाऊ, तीन बहिणी असा परिवार आहे.

## बबनराव चन्ने यांचे अल्प आजाराने निधन

नगर - पाटील कॉलनी, दत्त मंदिर, केडगाव येथील रहिवासी



बबनराव रंगनाथ चन्ने (वय ८५) यांचे ९ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १० ऑक्टोबर रोजी केडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, २ मुली, जावई, नातू, नात, पुतणे, पुतण्या, नात जावई असा परिवार आहे. ते मुकुंद चन्ने यांचे वडील, केडगाव येथील नागेश्वर टेलर्सचे संचालक एकनाथ सुरसे व मिनीनाथ सुरसे यांचे ते मामा होत. अ.नगर जिल्हा सहकारी बँक व जिल्हा मराठा संस्थेच्या फर्निचर कामाचे उत्कृष्ट कारागीर होते.

# पोलीस उपनिरीक्षक अंबादास हुलगे यांना राष्ट्रपती पदक

### राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते सन्मान



नगर - अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलातील बॉम्ब शोधक व नाशक पथकाचे पोलीस उपनिरीक्षक अंबादास हुलगे यांना गुणवत्तापूर्ण सेवेबद्दलचे मानाचे राष्ट्रपती पोलीस पदक प्रदान करून गौरविण्यात आले आहे. हा राज्यस्तरीय पोलीस पदक अलंकरण सोहळा ९ ऑक्टोबर रोजी दुपारी दरबार हॉल, लोकभवन, मलबार हिल, मुंबई येथे महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते झाला.

या सोहळ्यात २०२२ व २०२३ च्या स्वातंत्र्य दिनानिमित्त तसेच २०२३ व २०२४ च्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रपती यांनी जाहीर केलेली पदके प्रदान करण्यात आली. यामध्ये २ जणांना पोलीस शौर्य पदक, १८ जणांना शौर्य पदक, ३ जणांना उल्लेखनीय सेवेचे राष्ट्रपती पदक, ४ जणांना गुणवत्तापूर्ण सेवेचे राष्ट्रपती पदक आणि ४० जणांना पोलीस पदक व ३६ जणांना गुणवत्तापूर्ण सेवेचे पदक प्रदान करण्यात आले.

या सोहळ्यास गृह राज्यमंत्री (ग्रामीण) डॉ. पंकज भोयर, अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) श्रीमती मनिषा म्हैसकर, पोलीस महासंचालक सदानंद दाते, अतिरिक्त पोलीस महासंचालक नवल बजाज यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी, सन्मानित अधिकारी-अंमलदार व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

उपनिरीक्षक अंबादास हुलगे यांना हा मानाचा सन्मान मिळाल्याबद्दल अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्यासह जिल्हा पोलीस दलातील सर्व पोलीस निरीक्षक, अधिकारी व अंमलदार यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# नगरच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर इसमाचा अंगावर ज्वलनशील पदार्थ ओतून आत्महत्येचा प्रयत्न

नगर - येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात एका व्यक्तीने स्वतःकडील हिरव्या रंगाच्या ड्रममधील डिझेलसारखा ज्वलनशील पदार्थ निष्काळजीपणे व स्वतःच्या अंगावर ओतून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीवर कायदेशीर कारवाई सुरू आहे.

९ ऑक्टोबर रोजी दुपारी २.३० वाजण्याच्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे हा प्रकार घडला. आरोपी नितीन दत्तात्रय आजबे (रा. मेनरोड, जामखेड, ता. जामखेड) याच्या भावाने जामखेड मधील कलाकेंद्र बंद करावेत या मागणीसाठी उपोषण सुरु केलेले आहे. तसेच ही मागणी तात्काळ मान्य करावी यासाठी नितीन आजबे याने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता. त्यानुसार जामखेड पोलीस ठाण्याच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात पोलीस बंदोबस्त नेमला होता. नितीन आजबे हा जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आला आणि त्याने अचानक स्वतःकडील हिरव्या रंगाच्या ड्रममधील ज्वलनशील द्रव पदार्थ निष्काळजीपणे हाताळून तो स्वतःच्या अंगावर ओतून घेतला. लोकांच्या जीवितास धोका निर्माण होईल याची पूर्ण जाणीव असतानाही त्याने स्वतःच्या अंगावर तो द्रव पदार्थ ओतून आत्महत्येचा प्रयत्न केला.बंदोबस्तावर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी तातडीने धाव घेत त्याला ताब्यात घेतले व आत्मदहन करण्यापासून रोखले. या प्रकरणी पो.कॉ.ईश्वरसिंग परदेशी (वय ३८, नेमणूक जामखेड पोलीस स्टेशन) यांनी फिर्याद दिली असून, त्यांच्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेचे कलम २८७ व २२६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा तपास पोलीस अंमलदार चांगदेव आंधळे करत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### मुलांची उंची वाढविण्यासाठी

प्रत्येक आई-वडिलांना वाटते की आपल्या मुलाची उंची चांगली व्हावी. उंची ही फक्त अनुवंशिकतेवर म्हणजे आई-वडिलांच्या उंचीवर अवलंबून नसते तर योग्य आहार आणि योग्य खेळ यावर सुद्धा खूप अवलंबून असते. मुलांचे वय ५ ते १८ वर्ष हे उंची वाढीसाठी सगळ्यात महत्वाचे असते. या वयात शरीरात वाढ संप्रेरक म्हणजे ग्रोथ हार्मोन जास्त प्रमाणात तयार होत असतो. जर या काळात योग्य काळजी घेतली तर उंची नक्की वाढते. सगळ्यात पहिले दूध. दूध हे मुलांसाठी पूर्ण अन्न आहे. दुधामध्ये कॅल्शियम भरपूर प्रमाणात असते ज्यामुळे हाडे मजबूत होतात आणि लांब होतात. रोज सकाळी आणि रात्री एक ग्लास कोमट दूध दिल्याने शरीराला प्रोटीन आणि कॅल्शियम मिळते. फक्त दूध नाही तर दुधापासून बनलेले दही, पनीर, ताक हे सुद्धा तितकेच फायद्याचे आहे. ज्या मुलांना दुधाची ॲलर्जी आहे त्यांनी सोया मिल्क किंवा नाचणीचे सत्व घ्यावे. नाचणीमध्ये दुधापेक्षा जास्त कॅल्शियम असते. शाकाहारी आहेत डाळी, सोयाबीन, शेंगदाणे आणि कडधान्ये जास्त खावीत. प्रोटीन शिवाय उंची वाढू शकत नाही हे लक्षात ठेवावे. तिसरा आणि सगळ्यात महत्वाचा भाग म्हणजे खेळ आणि व्यायाम. आजकाल मुले मोबाईलवर जास्त वेळ घालवतात आणि मैदानात खेळत नाहीत म्हणून उंची खुंटते. उंची वाढवण्यासाठी लटकणे हा सगळ्यात चांगला व्यायाम आहे. रोज सकाळी २ ते ३ मिनिटे बारला लटकल्याने पाठीचा कणा सरळ होतो आणि उंची वाढण्यास मदत होते. त्याच बरोबर दोरीवरच्या उड्या, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, पोहणे आणि धावणे या खेळांनी शरीर ताणले जाते आणि ग्रोथ हार्मोन जास्त तयार होतो. सूर्यप्रकाशात सकाळी ७ ते ८ या वेळेत खेळल्याने शरीराला नैसर्गिक व्हिटॅमिन डी मिळते जे उंची वाढीसाठी अत्यंत गरजेचे आहे. शेवटी एक महत्वाची गोष्ट म्हणजे झोप. मुलांनी रात्री १० वाजता झोपणे गरजेचे आहे कारण ग्रोथ हार्मोन रात्री झोपेतच सगळ्यात जास्त तयार होतो.

## पाककला

### छोले हांडी मसाला

**साहित्य :** काबुली चणे २५० ग्रॅम, मध्यम बारीक चिरलेले कांदे २, बारीक चिरलेले टोमॅटो २, आले लसूण पेस्ट १ चमचा, दही २ चमचे, काजू पेस्ट १ चमचा, बटर २ चमचे, तेल २ चमचे, १ चमचा छोले मसाला, १ चमचा लाल तिखट, १/२ चमचा धने पावडर, १/४ चमचा हळद, १/४ चमचा गरम मसाला, १/४ चमचा जिरे पावडर, चवीनुसार मीठ, १ चमचा कसुरी मेथी, बारीक चिरलेली कोथिंबीर १ चमचा

**कृती :** काबुली चणे रात्रभर पाण्यात भिजवून घ्या. सकाळी कुकरमध्ये मीठ टाकून ६ शिट्ट्या करून उकडून घ्या. हांडी किंवा कढईत बटर आणि तेल गरम करा. त्यात जिरे टाकून बारीक चिरलेला कांदा सोनेरी रंग येईपर्यंत परता. त्यात आले लसूण पेस्ट टाकून परता. आता बारीक चिरलेला टोमॅटो टाकून मऊ होईपर्यंत शिजवा. त्यात काजू पेस्ट आणि दही टाकून हलवा. आता लाल तिखट, धने पावडर, हळद, जिरे पावडर, छोले मसाला, गरम मसाला आणि मीठ घालून मिश्रण एकजीव करा आणि तेल सुटेपर्यंत परता. त्यात उकडलेले छोले आणि थोडे छोलेचे पाणी घालून जाडसर थर येईपर्यंत शिजवा. त्यावर कसुरी मेथी चोळून टाका. हांडी गरम करून त्यावर थोडे बटर सोडा. छोले हांडीत ठेवा आणि वरूनही बटर लावा. मध्यम आचेवर दोन मिनिटे दम द्या. तयार छोले हांडी मसाल्यावर बारीक चिरलेली कोथिंबीर, आल्याचे काप आणि लिंबू ठेवून भटूरे किंवा कुलच्याबरोबर गरम सर्व्ह करा.

## वास्तू

### लायब्ररीसाठी सल्ला

लायब्ररीसाठी सगळ्यात बेस्ट दिशा पश्चिम किंवा नैऋत्य आहे. पुस्तके जड असतात, त्यामुळे जडत्व नैऋत्येला असावे. दुसरा बेस्ट ऑप्शन पूर्व दिशा आहे. अभ्यासासाठी पूर्व दिशा खूप चांगली मानली जाते.

## सौंदर्य

मोठी दाढी असेल तर रोज तेल आणि कंगवा कंपल्सरी. क्लीन शेव करणाऱ्यांनी शेव नंतर तुरटी लावा आणि मॉइश्चरायझर लावा.

## सल्ला

बिर्याणीला वास छान येण्यासाठी शेवटी केशराचे दूध आणि तळलेला कांदा टाका.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

रविवार, दि. ११ ऑक्टोबर २०२६

**घटस्थापना, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आश्विन शुक्लपक्ष, चित्रा २२।३३, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष** – आजचा दिवस उत्साहाचा आहे. कामात यश मिळेल.

**वृषभ** – आज खर्च वाढण्याची शक्यता आहे. बोलण्यावर ताबा ठेवा.

**मिथुन** – नवीन काम सुरु करण्यासाठी चांगला दिवस. मित्रांची मदत मिळेल.

**कर्क** – मन थोडे अस्वस्थ राहील. कामाच्या ठिकाणी वाद टाळा.

**सिंह** – नोकरीत बढतीचे योग आहेत. वरिष्ठ खूश होतील. प्रवास होऊ शकतो.

**कन्या** – आरोग्याची काळजी घ्या. पोटाचे विकार होऊ शकतात.

**तूळ** – प्रेमाचा दिवस आहे. जोडीदारासोबत वेळ घालवाल.

**वृश्चिक** – जुने पैसे परत मिळतील. शत्रू दूर राहतील.

**धनु** – मुलांकडून आनंदाची बातमी मिळेल. देवाचे दर्शन होईल.

**मकर** – जमिनीच्या कामात लाभ होईल. सासू-सासऱ्यांकडून मदत मिळेल.

**कुंभ** – आज मेहनत जास्त करावी लागेल पण फळ चांगले मिळेल.

**मीन** – पैशाचा ओघ चांगला राहील. नवीन कपडे किंवा वस्तू खरेदी कराल.

## शब्दगंध क्र. ७५३४ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ■ | ३ | ४ | | ■ | ५ |
| ६ | | | | | ■ | ७ | |
| ८ | | ■ | ९ | | १० | ■ | |
| ■ | ११ | १२ | ■ | ■ | १३ | १४ | |
| १५ | | | १६ | १७ | ■ | | ■ |
| | ■ | १८ | | | | ■ | १९ |
| २० | २१ | | ■ | | ■ | २२ | |
| ■ | | ■ | २३ | | | | |

**आडवे शब्द :-** १) पोटात तयार होणारा एक क्षुद्र जीव किंवा कृमी जो हानिकारक असतो ३) एक देवी ६) अगदी गोल; वाटोळा ७) मासे पकडण्याची आकडा लावलेली काठी ८) वाईट सवय; खोड ९) लागलीच; त्वरित; थेट ११) वीस दस्ते कागद १३) चापटी; थप्पड १५) खात्री; भरवसा १८) किल्ल्यावरचा पहारेकरी; किल्लेदार २०) रसाने भरलेले; रसमय २२) देवाचे नाव किंवा मंत्र यांचा पुन्हा पुन्हा उच्चार २३) किराणा दुकानातून आणलेल्या वस्तू

### शब्दगंध क्र. ७५३३ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| चं | च | ल | ■ | स | त | ल | ज |
| ब | र | ग | डी | ■ | ला | ■ | ळ |
| ळ | ■ | ब | र | क | त | ■ | म |
| ■ | मा | ग | ■ | सा | ल | प | ट |
| का | न | ■ | बा | ब | ■ | री | ■ |
| वे | स | क | र | ■ | फा | ट | क |
| बा | ■ | ल | दा | ब | ■ | ■ | ला |
| ज | स्त | ■ | न | ग | र | पा | ल |

**उभे शब्द :-** १) अरण्य; वन; कांतार; कानन; रान २) चलाख; हुशार; ताजातवाना ३) वांगे भाजून केलेले एक कालवण ४) लवकर न तुटणारे; लवचीक ५) काळ्या पाठीचे हरिण १०) कहाणी; गोष्ट; स्टोरी १२) ग्लानी; शीण; थकवा १४) पंख असलेली गोष्टीतील स्त्री १५) मातीच्या भांड्याचा फुटका तुकडा १६) वजनदार; मंद बुद्धीचा; हलका नसलेला १७) माकडाची मादी १९) श्मश्रूः हजामत २१) तापलेल्या दुधावर येणारा पापुद्रा; मलई २२) गोळा झालेले; आय; मिळकत

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** जन्म आणि मृत्यूच्या मध्ये जे सुंदर आहे त्यालाच जीवन म्हणतात.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### इलेक्ट्रिक गाडी पेट्रोल गाडीपेक्षा चांगली का?

याचे उत्तर जर सोप्या भाषेत सांगायचे झाले तर पेट्रोल गाडी ही जुनी टेक्नॉलॉजी झाली आहे आणि इलेक्ट्रिक गाडी ही भविष्याची गरज आहे. सगळ्यात पहिला आणि मोठा फरक म्हणजे खर्चाचा. पेट्रोल गाडीला एका किलोमीटरला साधारण ७ ते १० रुपये खर्च येतो कारण पेट्रोल १०५ रुपयांवर गेले आहे, तर इलेक्ट्रिक गाडीला एका किलोमीटरला फक्त १ ते दीड रुपया खर्च येतो कारण ती घरीच चार्ज होते आणि एका फुल चार्जमध्ये ३०० ते ४०० किलोमीटर धावते. म्हणजे महिन्याला जर तुम्ही १००० किलोमीटर फिरत असाल तर पेट्रोल गाडीला ८००० रुपये लागतील आणि इलेक्ट्रिकला फक्त १२०० रुपये. दुसरा मोठा फायदा म्हणजे मेंटेनन्स. पेट्रोल गाडीमध्ये इंजिन, गिअरबॉक्स, क्लच, सायलेन्सर, ऑईल बदलणे असे शेकडो पार्ट असतात जे सारखे खराब होतात, तर इलेक्ट्रिक गाडीमध्ये इंजिनच नसते फक्त एक मोटर आणि बॅटरी असते त्यामुळे सर्व्हिसिंगचा खर्च ८० टक्के कमी होतो आणि गाडी खराब होण्याचे प्रमाणही खूप कमी असते.

तिसरा मुद्दा म्हणजे चालवण्याची मजा. इलेक्ट्रिक गाडीमध्ये गिअर नसतात, आवाज नसतो, कंपन नसते, चावी फिरवताच गाडी सुसाट पळते आणि पिकअप तर पेट्रोल गाडीपेक्षा दुप्पट असतो, त्यामुळे शहरात चालवायला खूप सोपी आणि आरामदायी वाटते. चौथा आणि सगळ्यात महत्वाचा मुद्दा म्हणजे पर्यावरण. पेट्रोल गाडी धूर सोडते, प्रदूषण करते, त्यामुळे आपले आरोग्य खराब होते, पण इलेक्ट्रिक गाडी अजिबात धूर सोडत नाही, त्यामुळे ती निसर्गासाठी आणि आपल्या मुलांच्या भविष्यासाठी खूप चांगली आहे. आता लोक म्हणतात चार्जिंगचे काय, तर पूर्वी ही समस्या होती पण आता प्रत्येक पेट्रोल पंपावर, मॉलमध्ये आणि हायवेवर चार्जिंग स्टेशन लागले आहेत आणि घरीच रात्री चार्ज केली की सकाळी गाडी फुल तयार असते. सरकार सुद्धा इलेक्ट्रिक गाडीवर सबसिडी देते, ढब्ज टॅक्स माफ करते आणि बॅटरीला ८ वर्षांची वॉरंटी मिळते. सुरुवातीला इलेक्ट्रिक गाडीची किंमत थोडी जास्त वाटते पण दोन-तीन वर्षात पेट्रोलच्या बचतीतून ती किंमत वसूल होते आणि नंतर गाडी जवळजवळ फ ुकट चालते. म्हणून जर तुमचा रोजचा वापर ५० किलोमीटरपेक्षा जास्त असेल आणि तुम्हाला शांत, कमी खर्चिक आणि आधुनिक गाडी हवी असेल तर पेट्रोल गाडीपेक्षा इलेक्ट्रिक गाडी नक्कीच चांगली आहे.

### पुस्तकाची किंमत

एका गावात रमेश नावाचा मुलगा होता. त्याला अभ्यासाचा खूप कंटाळा यायचा. शाळेची पुस्तके तो कधीच उघडत नसे, दिवसभर मोबाईलवर गेम खेळत बसायचा. एक दिवस त्याच्या आजोबांनी त्याला एक जुने, फाटके पुस्तक दिले आणि म्हणाले, हे वाच, यात खजिना आहे. रमेशने वैतागून पुस्तक कपाटात फेकून दिले. ८ दिवसांनी आजोबा म्हणाले, खजिना सापडला का?

रमेश म्हणाला, कसला खजिना? ते तर फाटके पुस्तक आहे. आजोबा हसले आणि म्हणाले, त्या पुस्तकाच्या ४७ व्या पानावर मी ५०० रुपये ठेवले होते. रमेश धावत गेला, पान उघडले तर खरच तिथे ५०० रुपये होते. तो खूप खुश झाला.

तेव्हा आजोबा म्हणाले, बघितलस, तू पुस्तक उघडलेच नाहीस म्हणून तुला ८ दिवस खजिना मिळाला नाही. पुस्तकाच्या प्रत्येक पानावर असाच ज्ञानाचा खजिना असतो, पण जो पुस्तक उघडत नाही त्याला तो कधीच मिळत नाही. त्या दिवसापासून रमेश रोज पुस्तक वाचू लागला.

बोध – पुस्तक कधीच फाटके नसते, आपली नजर फाटकी असते. जो पुस्तक वाचतो तोच खरा श्रीमंत होतो.

## आत्मशक्ति



### अध्यात्मिक शक्ती

ज ा ` प य ॅ त अनेकत्त्वाचा विचार असतो आणि एकतेची जाणीव नसते तोपर्यंत म नुष्य अज्ञानी राहून स्वतः चे स्वतंत्र असे एक व्यक्तित्व आहे असे समजतो आणि कर्मांचा ''कर्ता'' बनून त्यांचे फळ भोगतो. असा मनुष्य जन्म-मृत्युच्या फेऱ्यात अडकतो, सुख-दुःख मानतो आणि आपल्या चांगल्या व वाईट कर्मांनी स्वतःला बांधून घेतो. (श्रीमदभगवतगीता ११.४)बौध्द लोकांच्या परंपरेत आले आहे, शक्तिहीन होऊन 'मी' च्या विचाराने स्वतःला चुकीचे सुरवातीला विहीरीत बादली सरकत चालते. नंतर ''माझे'' विचाराने वस्तुंवर मोहीत होते.(चंद्राकीर्ति, मध्यमकाव तारा ३) अहंकार दूर करण्यासाठी विवेकाची व मनावर पूर्ण ताबा ठेवण्याची गरज असते. आम्हाला धनसंपत्तीची घमेंड असते. आमच्याजवळ एवढा पैसा, धन-दौलत आहे असा आम्हाला अहंकार होतो. आम्ही खूप धनवान आहोत असा गर्व झाल्याने आमच्यापेक्षा कमी पैशावाल्यास हलके समजतो. गर्व आम्हाला गरीबांच्या मनाला ठेच लागेल असेच वागण्यास गर्व भाग पाडतो.आम्हाला ज्ञानाचा अभिमान होतो. आमच्या पदव्यांबाबत आम्ही फ ुशारकी मारतो. (क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाती घट्ट विणू या

सुरेश ओबेरॉय : जेव्हा माझ्या कुटुंबातील किंवा मित्रपरिवारातील कोणी थंड हवेच्या ठिकाणी जातं तेव्हा मी त्यांना थंडीपासून बचाव करण्यासाठी गरम कपडे घालायचा सल्ला देतो. कधीकधी ते असं करायला नकार देतात कारण ते त्यांच्या फॅशनमधे बसणारं नसतं. अशा वेळी ते त्यांच्या शारीरिक स्वास्थ्याबरोबर तडजोड करायला तयार असतात. शिवानीदीदी : आपण आपल्या सोयीसुविधांचा विचारही करत नाही.सुरेश ओबेरॉय : याचा अर्थ आपण एवढे कमकुवत झालो आहोत की आपण प्रशंसेची भीक मागत आहोत. एखाद्या कार्यक्रमाला खूप महाग दागिने घालून गेल्यानंतर त्या दागिन्यांची कोणीच प्रशंसा केली नाही, अशी तक्रार आपण करतो.शिवानीदीदी : वास्तविक, इतक्या लाखांच्या दागिन्यांचं कोणी कौतुक केलं नाही म्हणून आपल्याला ते आवडेनासे होतात. हा दुबळेपणा आहे. कपडे आणि दागिने खूप किरकोळ गोष्टी आहेत. पण जेव्हा आपण आयुष्यातले मोठे निर्णय घेतो आणि स्वतःवर विश्वास ठेवत नाही किंवा स्वतःशी प्रामाणिक नसतो तेव्हा आपण इतरांच्या मतांवर अवलंबून राहतो.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## साहित्य सहवास – 'हम जहा खडे होते है...'

अमिताभ बच्चन सुपरस्टार, स्टार ऑफ द मिलेनियम होण्यामध्ये त्यांच्या तोंडी असणाऱ्या संवादांचे विशेष योगदान आहे. आपण चित्रपटात भूमिका करावी, ती सुध्दा हिरोची भूमिका करावी असं अनेकांना वाटत असतं. मोठ्या पडद्यावर स्वतःला पाहण्याचं स्वप्न अनेकजण आजही पाहतात पण फिल्म इंडस्ट्रीत स्वतःला सिध्द करणरं, तिथं टिकणं अजिबात सोपं नाही. अनेक कलाकार प्रतिभावान आहेत, आपल्यापेक्षाही खुपच चांगले आहेत हुशार आहेत हे लक्षात येतं. ज्यावेळी आपलं स्वप्न पूर्ण होत नाही आणि चित्रपटगृहात जाऊन चित्रपट पाहु लागतो तेव्हा पडद्यावरील हिरोच्या जागेवर स्वतःला लागतो. पडद्यावरचा हिरो जेव्हा अमिताभ असतो तेव्हाचा आनंद नक्कीच वेगळा असतो.

पाहु

१९८१ साली रिलीज झालेल्या 'कालिया' ह्या चित्रपटातील हा अमिताभच्या तोंडी असलेला संवाद – हम भी वो है जो कभी किसीके पिछे नही खडे होते. हम जहां खडे होते है लाईन वहीसे शुरु होती है – त्यावेळी हा अमिताभच्या तोंडी असलेला संवाद पूर्ण झाला की थिएटर टाळ्या, शिट्ट्यांनी उत्साहाने भरलेलं असायचं. 'कालिया' चित्रपटातील ह्या दृष्यात बॉब क्रिस्टोची दहशत कैद्यांना वाटत असते. जेवणाच्या रांगेत उभे न राहता एका अपंग कैद्याच्या हातातले ताट स्वतःकडे घेतो आणि त्या अपंग कैद्याला ढकलुन देतो. त्या ताटात अन्न घेऊन निघतांनाच अमिताभ येतो आणि ते ताट, बॉब क्रिस्टोच्या हातातुन ओढुन घेऊन स्वतःच्या हातात घेतो. त्यानंतर बॉब क्रिस्टो आणि अमिताभ ह्यांच्यातील फायटिंग. बॉब क्रिस्टोची यथेच्छ धुलाई करुन अमिताभ लोखंडी सळई वाकवुन म्हणतो 'कालिया सब कुछ कर सकता है निहत्ते पे वार नही करता.'– प्रत्येक चित्रपट चांगलं देण्याचा प्रयत्न करत असतो. अपंग कैद्याच्या हातातलं जेवणाचं ताट हिसकावुन घेणारा आणि कैद्यांमध्ये दहशत निर्माण करणारा बॉब क्रिस्टो हा वाईट विचार, आचाराच्या व्यक्तीचं प्रतिनिधित्व करतो. तुमच्यासमोर एखाद्यावर अन्याय होत असतांना तुम्ही गप्प बसणार आहात का ? ज्याच्यावर अन्याय होत आहे तो अपंग असेल तरीसुध्दा तुम्ही गप्प बसणार आहात का ? हा प्रश्न नक्कीच आपल्या मनात निर्माण होणार आहे. अन्यायाविरुध्द चीड असणारा नायक प्रत्येकात असतोच पण अन्याय करणारी व्यक्ती वाईट विचार – आचाराची, निर्दयी असते तेव्हा आपण दहा वेळा विचार करतो की ह्याला आपण बदडलं तर हासुध्दा आपल्याला सोडणार नाही. पण हा विचार न करता अमिताभरुपी नायक अशा अन्याय करणाऱ्याला स्वतःचा आत्मविश्वास, स्वतःमधील ताकदीमुळे चारी मुंड्या चीत करतो.

पुढे तो आपलं काय करेन हा विचार त्यावेळी करता येईल पण आत्ता ह्याक्षणी अन्याय सहन करायचाच नाही ही त्या क्षणाची मागणी असते आणि ती मागणी अगदी योग्य असते. अन्याय करणाराला घाबरुन प्रश्न सुटणार नाही तर अन्याय करणाऱ्याला यथेच्छ बदडुन योग्य तो संदेश समाजाला मिळेल हिच भावना 'कालिया' चित्रपटाचे लेखक टिन्नु आनंद ह्यांची असणार आहे. टिन्नु आनंद ह्यांचे वडिल ज्येष्ठ लेखक इंदर राज आनंद ह्यांनी कालिया चित्रपटातील संवाद लिहिले आहेत.

'कालिया' असो अथवा अमिताभचा कोणताही चित्रपट पाहात असतांना हिरोच्या भूमिकेत जाऊन विचार करणं ही प्रत्येक प्रेक्षकासाठी महत्वाचं आहे. अन्याय करणारी कोणतीही व्यक्ती आपण कधीच स्वीकारु शकणार नाही, आवडणार नाही. म्हणजेच आपल्या आत, मुळातच चांगुलपण भरलेलं आहे. हे चांगुलपण म्हणजेच अमिताभरुपी हिरो.

तुम्हीही स्वतः अन्याय सहन करु नका आणि कुणावर अन्याय होत असेल तर तोसुध्दा सहन करु नका हे सांगण्यासाठीचा हा प्रसंग आपल्याला अंतर्मुख करतो. दमदार आवाजातला आणि विशिष्ठ स्टाईलमधील अमिताभच्या तोंडी असणारा हा संवाद आपल्यात चांगुलपणाचं बीज रोवतो. हम जहा खडे होते है... हे म्हणण्यासाठी आपण स्वतःला सिध्द करण्यासाठीचे प्रयत्न प्रचंड आहेत. स्वतःला सिध्द करणं अर्थात चांगल्या अर्थाने सिध्द करण्याची तयारी तेव्हाच होईल जेव्हा आपण चांगले विचार करु आणि त्या चांगल्या विचारानुसार कृती करु. मनात अन्यायाविरुध्द चीड निर्माण होणं जेवढं गरजेचं आहे त्यापेक्षाही महत्वाचं आहे अन्याय करणाऱ्याला यथेच्छ बदडणं अथवा कायद्याने योग्य अशी कृती करणं. प्रत्येकात अन्यायाविरुध्द आत्मविश्वासाने, खंबीरपणे लढणारा 'कालिया' असतोच. फक्त तो सशक्त आहे की दुर्बल आहे हे तुम्हीच ठरवा. आपलं प्रतिनिधित्व 'कालिया' ह्या पात्राच्या माध्यामातुन अमिताभने केलं आहे. म्हणूनच महानायक आपल्या मनात घर करुन आहे. आपल्या भोवताली काही 'बॉब क्रिस्टो' आहेतच. तुम्ही, त्यांच्या विरोधात लढण्याची शक्ती ठेवा. ते पुन्हा अन्याय करणार नाहीत एवढी दहशत तुम्हीही निर्माण करु शकता.

(लेख क्र.६२१)

– **सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

## हसा आणि शतायुषी व्हा!

सासू – जावईबापू, तुम्ही लग्नाआधी सांगितलं होतं की तुम्ही माझ्या मुलीशिवाय राहू शकत नाही.
जावई – हो सासूबाई, पण तेव्हा मला माहिती नव्हतं की तिच्यासोबत तुम्ही फ्री मध्ये येणार आहात!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* चीनमधील कम्युनिस्ट पक्षाची स्थापना कोणत्या वर्षी झाली?
– १९२१ साली

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### आयुर्वेदिक गर्भसंस्कार

स्त्री-रुग्णाचा इतिहास विचारला असता लग्नाआधीच लहान वयात पेंडिक्सचे ऑपरेशन झाले होते. त्या वेळी मी विचार करून कदाचित पेंडिक्सचा जंतुसंसर्ग हा गर्भाशयापर्यंत पोहोचला असेल व पोटातील स्नायू, अवयव यांची गुंतागुंत झालेली असेल हे लक्षात ठेवून मी त्यांना दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला. त्यांनीही तो लगेचच ऐकला. शस्त्रक्रिया केली असता स्त्री रुग्णाच्या दोन्ही गर्भनलिका बंद आहेत हे लक्षात आले.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# गांधी ज्वेलर्स, पुणे च्या वतीने अहिल्यानगरमध्ये १२ ऑक्टोबरपासून आकर्षक आभूषणांचे प्रदर्शन







नगर – दागिन्यांच्या वैविध्यपूर्ण आणि आकर्षक कलेक्शनचा अनुभव घेण्यासाठी अहिल्यानगरकरांसाठी खास तीन दिवसांची सुवर्णपर्वणी सुरू होत आहे. गांधी हाउस ऑफ ज्वेल्स – बाय गांधी ज्वेलर्स (पाबळवाला), पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आकर्षक आभूषणांच्या या प्रदर्शनाला १२ ऑक्टोबर रोजी हॉटेल आयरिस प्रीमिअर, अहिल्यानगर येथे सुरुवात होत आहे. हे प्रदर्शन १२, १३ आणि १४ ऑक्टोबर दरम्यान सुरू राहणार असून, या प्रदर्शनाचा उद्घाटन सोहळा १२ ऑक्टोबर रोजी सकाळी १०:३० वाजता होणार आहे.

या प्रदर्शनाचे उद्घाटन सौ. धनश्री सुजय विखे पाटील, सौ. शीतल संग्राम जगताप, डॉ. सौ. कल्याणी चौधरी, डॉ. सौ. ज्योत्सना डौले आणि सौ. मंजू सुनिल मुनोत यांच्या हस्ते होणार आहे. तसेच सौ. सुधा कांकरिया, सौ. प्राची पाटील, सौ. साधना कांकरिया, सौ. सविता कांकरिया, सौ. मनीषा लोढा आणि सौ. हेमा शेलोत यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

### लग्नसराईपासून सण–समारंभापर्यंत प्रत्येक प्रसंगासाठी खास कलेक्शन

या प्रदर्शनात वैविध्यपूर्ण, आधुनिक आणि पारंपरिक दागिन्यांच्या खास कलेक्शनचा प्रत्यक्ष अनुभव ग्राहकांना घेता येणार आहे. पारंपरिक कलाकुसरीची समृद्धता आणि आधुनिक डिझाइन्सची मोहकता यांचा सुरेख मिलाफ या प्रदर्शनात पाहायला मिळणार आहे. विवाहसोहळे, सण–समारंभ तसेच आयुष्यातील प्रत्येक खास प्रसंगासाठी दागिने खरेदी करू इच्छिणाऱ्या ग्राहकांसाठी विविध प्रकारच्या दागिन्यांची निवड एकाच छताखाली करण्याची ही एक उत्तम संधी ठरणार आहे.

### मेकिंग चार्जेस फक्त ७% पासून सुरू!

या प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण म्हणजे ग्राहकांसाठी मेकिंग चार्जेस फक्त ७% पासून सुरू असणार आहेत. त्यामुळे मनपसंत दागिन्यांची खरेदी करताना ग्राहकांना आकर्षक सवलतीचा आणि पारदर्शक सेवेचा लाभ घेता येणार आहे.

१२, १३ आणि १४ ऑक्टोबर दरम्यान हॉटेल आयरिस प्रीमिअर येथे आयोजित या प्रदर्शनाला अहिल्यानगरकरांनी भेट देऊन गांधी ज्वेलर्सच्या खास डिझायनर कलेक्शनचा अनुभव घ्यावा, असे आवाहन गांधी ज्वेलर्स (पाबळवाला), पुणे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

## दुष्कर्माची लाज वाटली पाहिजे




एखाद्याने वाईट काम केले. दुसऱ्या कुणी त्याला कुठे हटकले? कारण त्याचेही वागणे वाईटच होते. आंधळ्याने काय आंधळ्यावर डोळे वटारावेत ? पण वाईट काम करणाऱ्यांना लाजच वाटू नये? नाही दुसऱ्यांची, पण निदान स्वतःची? महाभारत सांगते, वाईट कृत्य घडले. नसेल लोकांना कळले म्हणून काय ते लज्जास्पद नव्हे असे ठरले? नसो लोकांची लाज, पण स्वत:ला तरी व्हावा पश्चाताप. लागावी रुखरुख. हरवावे आपले सुख. मग करावा निर्धार, नाही पुन्हा कधी वाईट करणार. तेव्हा होतो माणूस मोठा. किती तरी प्रकारे त्याचे मनोबल वाढते. शुद्ध मनाचा, नेहमी शुभकर्माकडे कल. तसा मनात शांततेचा अंमल. निर्मल मनात समाधान सफल. उत्साह वाढतो सगळ्यांचे भले करायला. सूर्य कसा तळपतो तेजाने ? शुभकर्म करणारादेखील नावाजतो कीर्तीने.

समर्थ रामदास म्हणतात, उचित हित करावे उद्धरावे धरावे। अनुचित न करावे त्वा जनी देश द्यावे।। अघटित घडवावे सेवका सोडवाव। हरिभजन घडावे दुःख ते विघडावे।। लोकांचे योग्य असे कल्याण करावे, स्वतःचेही हित साधावे, दीनदुबळ्यांना दुःखातून सोडवावे. वाईट कर्म न आचरावे. लोकात नाव कमवावे. हे रामचंद्रा, कुकर्माची आम्हाला स्वत:लाच लाज वाटेल, असे घडू दे. सामान्यपणे असे घडत नाही. वाईट कृत्य केल्याची स्वत:ला लाज तर सोडा, पण ते पचले म्हणून माज मात्र येतो. तशा अपरात्रीतून सोडव. हरिभजनासारखे सत्संग सदा घडवू, वाईट कर्म केल्याने प्राप्त झालेले दुःख सोसले, आता पुन्हा तसे न व्हावे, नको कधी वाईट कारणे, नको कधी दुःख भोगणे.

हातून वाईट कर्म घडले, पण भ्रपस्तावा घडला। सर्व कळो आला। आता सांगावे कोणाला । चुका पडिला ।।

वाईट कर्माचा पश्चाताप झाला. वाईट केल्याने अद्दल घडते हा अनुभव आला. अपराध घडला. पण आता सांगावे कोणाला ? स्वत:चीच लाज वाटते स्वतः ला. आता उमजले नीट की आम्ही आपुल्यागुणे। भोगितो दु:ख दुणे।। तुज काय शब्द ठेवणे। लाताडपणे

आम्ही आमचे गुण उधळतो. बेफाम वागतो. धनदौलतीमागे वेड्यासारखे धावतो. मग प्रचंड दु:ख भोगतो. यात कुणाचा काय दोष? केवळ उन्माद चढलेला मला मी शुद्धबुद्ध हरवलेला. आता पडते, अरे स्वतःची तरी लाज धरा? दु:खाची खाई पार करा.

स्वत:वर विजय मिळवा. इतर हजारोंना जिंकण्यापेक्षा तो विजय मोठा ठरेल. तो असे न करेल, तो तर दुःख भोगेल. इतरांना फसवाल, स्वत:च त्यात फसाल. – किशोर गांधी



सॅमसंग इलेक्ट्रॉनिक कंपनीच्या पुणे शाखेंअंतर्गत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल सेल्स टीमचा सन्मान करताना राम एजन्सीचे संचालक राम मेंघानी.

# उत्कृष्ट कामगिरीबद्दल राम एजन्सीचा सॅमसंग कंपनीच्यावतीने सन्मान

नगर – विक्री वृद्धीसाठी उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर नगरमधील इलेक्ट्रॉनिक क्षेत्रातील शोरूम असलेल्या राम एजन्सीने, उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सॅमसंग कंपनीच्या पुणे शाखेअंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणारे स्टोअर म्हणून राम एजन्सी यांना कंपनीच्या वतीने स्मृतिचिन्ह प्रदान करून सन्मानित करण्यात आले. हा गौरव म्हणजे स्टोअरच्या उत्कृष्ट कामगिरीची आणि ग्राहकांच्या विश्वासाची पोचपावती मानली जात आहे. या यशामुळे राम एजन्सीच्या टीममध्ये आनंदाचे वातावरण असून, भविष्यातही ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देण्याचा निर्धार राम एजन्सीचे संचालक राम मेंघानी यांनी व्यक्त केला.

# शिवपाणंद शेतरस्त्यांच्या प्रश्नांवर नगरमध्ये १२ ऑक्टोबरला बैठक

नगर – राज्यातील शेतकऱ्यांच्या हक्काचे शिवपाणंद शेतरस्ते अतिक्रमणमुक्त करून त्यांचे प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने १२ ऑक्टोबर रोजी अहिल्यानगर येथे संवाद व नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० वाजता शासकीय विश्रामगृहात होणाऱ्या या बैठकीत शेतरस्त्यांचे सीमांकन, कायमस्वरूपी हद्दखुणा, रस्त्यांचे मजबुतीकरण, सिमेंट काँक्रिट रस्त्यांची निर्मिती आणि प्रलंबित प्रकरणांचा निपटारा याबाबत सविस्तर चर्चा होणार आहे. शरद पवळे यांच्या पुढाकारातून ही बैठक आयोजित करण्यात आली आहे.

गाव नकाशावर नोंद असलेल्या शेतरस्त्यांच्या प्रत्यक्ष जागेवरील हद्दी निश्चित करणे, अतिक्रमणामुळे बंद झालेले शिवपाणंद रस्ते खुले करणे आणि सीमांकनानंतर कायमस्वरूपी हद्दखुणा बसविण्याच्या प्रक्रियेला गती देणे, या प्रमुख विषयांवर बैठकीत भर दिला जाणार आहे. शेतरस्त्यांच्या प्रश्नांसाठी शेतकऱ्यांना वारंवार शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, यासाठी प्रशासनाकडे प्रभावी पाठपुरावा करून प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने नियोजन केले जाणार आहे. शेतरस्त्यांसंदर्भातील प्रकरणे दीर्घकाळ प्रलंबित राहू नयेत, यासाठी 'मिशन झिरो पेंडन्सी'च्या धर्तीवर कालमर्यादेत कार्यवाही करण्याचा आग्रह बैठकीत धरण्यात येणार आहे.

तालुकानिहाय प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेणे, सीमांकनाच्या कामांना गती देणे आणि संबंधित शासकीय यंत्रणांमध्ये समन्वय वाढविण्यासाठी ठोस कृती आराखडा तयार करण्यावर चर्चा होणार आहे.

# ए.एच. पोखरणा ज्वेलर्समध्ये 'महाबचतीचा सोनेरी उत्सव'

### सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर १०० टक्के पर्यंत सूट



अमित पोखरणा



आकाश पोखरणा

नगर – नवरात्र, विजयादशमी, दिवाळी या उत्सव काळात नवनवीन खरेदीचे बेत आखले जातात. याच उत्साही आनंददायी वातावरणात सुवर्ण खरेदीही आवर्जून केली जाते. नगरमधील ए.एच.पोखरणा ज्वेलर्सने ग्राहकांचा कल लक्षात घेवून नवनवीन आकर्षक व्हरायटीच्या दागिन्यांसह प्रत्येक खरेदी दुहेरी आनंदाची आणि महाबचत करणारी ठरेल अशी सोनेरी उत्सव योजना सुरू केली आहे. यात सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर १०० टक्केपर्यंत सूट तसेच जितके ग्रॅम सोने खरेदी तितके ग्रॅम चांदी मोफत मिळणार आहे. ज्वेलर्सच्या स्टेशन रोड सथ्था कॉलनी तसेच सर्जेपुरा या दोन्ही दालनात ही योजना सुरु असल्याची माहिती अमित पोखरणा व आकाश पोखरणा यांनी दिली.

अनिल पोखरणा यांनी सांगितले की, दसरा, दिवाळी हे भारतीय संस्कृतीतील सर्वात मोठे सण उत्सव आहेत. प्रत्येकाच्या जीवनात लखलखता प्रकाश आणणारा हा सण संस्मरणीय होण्यासाठी सोन्याची खास खरेदी केली जाते. दिवाळीनंतरच्या लग्नसराईसाठीही याच काळात सोने खरेदी होते. या पार्श्वभूमीवर नगरमधील ज्वेलर्सने खास योजना सुरू केली आहे. .

ग्राहकांना अतिशय निवांतपणे सुवर्णखरेदी करता येईल याची कायम काळजी घेतली आहे. जिल्ह्यातून तसेच राज्यातूनही ग्राहक या दालनात आवर्जून खरेदीसाठी येत असतात. या पर्वणी काळातील खरेदी संस्मरणीय करण्यासाठी ज्वेलर्स सज्ज झाले आहे. दालनात गंठणमध्ये अँटीक गंठण, पट्टी, राजकोट, डायमंड, मोती, काळे मणी, जेबी स्टोन, इटालियन मंगळसूत्र तसेच टेम्पल गंठणही उपलब्ध आहे. टेम्पलमध्ये नेकलेस, कानातले, अंगठी विविध आकर्षक व सुंदर डिझाईन उपलब्ध आहेत. दालनातील सर्व दागिने हॉलमार्क प्रणितच असून सोने (दागिने) मोडताना कुठल्याही प्रकारची घट कापली जात नाही.

नगर शहरात सर्वात कमी मजुरी दरही याच दालनात आहे. महिलांना चोखंदळपणे त्यांच्या मनातील डिझाईनचे सुवर्ण अलंकार याठिकाणी निश्चितच मिळतात. ५ ग्रॅमपासून ते १५० ग्रॅमपर्यंत वजनाच्या दागिन्यांची रेंज येथे आहे. दागिने तसेच हिऱ्यांची अत्युच्च गुणवत्ता याठिकाणी ग्राहकांना मिळते. डायमंडचे स्वतंत्र काउंटर दालनात आहे. चांदीचे पैंजण तसेच अन्य दागिने, भेट वस्तू, देवीदेवतांच्या मूर्ती, पूजा साहित्य, चांदीची नाणी दालनात आहेत. नवनवीन व्हरायटी, शुध्द, सुंदर दागिने पोखरणा ज्वेलर्सची वैशिष्ट्य आहे. खरेदीसाठी ग्राहकांनी दालनाला भेट द्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# दिशान गांधी करतोयं महाराष्ट्र राज्याचे नेतृत्व



नगर – लव्हली युनिव्हर्सिटी पंजाब येथे होत असलेल्या अंतरराज्यीय फेडरेशन चषक कॉर्फबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे नेतृत्व अहिल्यानगरचे दिशान किशोर गांधी करत आहे.

यात नगरचे काही खेळाडूही सहभागी होत असून दिशानकडे संघाला मार्गदर्शन करण्याचीही जबाबदारी दिली आहे. दिशानने अष्टपैलू कामगिरी करत दिल्ली धुरंधरच्या पहिल्या वहिल्या कॉर्फबॉल लिग स्पर्धेतील अजिंक्यपदात सिंहाचा वाटा उचलला होता.

अ.नगर जिल्हा कॉर्फबॉल असोसिएशनचे अध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार, उपाध्यक्ष डॉ. प्रकाश कांकरिया, ट्रेझरर सीए अजय गांधी व सर्व पदाधिकाऱ्यांनी या यशाबद्दल आनंद व्यक्त करीत खेळाडूंना शुभेच्छा दिल्या आहेत.

# दर्जेदार साहित्य वाचनातून अभिजात मराठी समृद्ध होईल : डॉक्टर राजा ठाकूर



ग्रंथ प्रदर्शन उद्घाटन व विद्यार्थ्यांसाठी आयोजित परिसंवादात बोलताना डॉक्टर राजा ठाकूर.

नगर – आपली भाषा आपले विचार व आपले एकंदर व्यक्तिमत्व समृद्ध होण्यासाठी आपलं सातत्याने वाचन करणे ही काळाची गरज आहे. माहिती तंत्रज्ञान आणि मोबाईलच्या युगात स्वतःला समृद्ध करण्यासाठी दर्जेदार साहित्यिकांचे साहित्य वाचन केले तर खऱ्या अर्थाने अभिजात मराठी भाषा ही समृद्ध होईल असा विश्वास अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. राजा ठाकूर यांनी व्यक्त केला.

अभिजात मराठी भाषा सप्ताह निमित्त जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय अहिल्यानगर जिल्हा वाचनालय व मेहता पब्लिकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ग्रंथ प्रदर्शन उद्घाटन व विद्यार्थ्यांसाठी आयोजित परिसंवादात डॉक्टर ठाकूर बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातील निरीक्षक रामदास शिंदे, वाचनालयाच्या संचालिका शिल्पा रसाळ, संचालक किरण आगरवाल, कवी चंद्रकांत पालवे, मेहता पब्लिकेशनचे समन्वय विशाल कोडीटकर, वाचन चळवळीचे रवींद्र बकोरे, अविनाश रसाळ, ग्राहक मंचेचे कार्यकर्ते व लेखक विलास जगदाळे, साहित्यिक शब्बीर शेख, संतोष वाडेकर, दादा चौधरी हायस्कूलचे मुख्याध्यापक अशोक डोळसे, बलराम दोमल, जिल्हा वाचनालय ग्रंथपाल अमोल इथापे, नितीन भारताल, पल्लवी कूक्कडवाल, सौ.वर्षा जोशी, संजय गाडेकर तसेच दादा चौधरी विद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे रामदास शिंदे यांनी बोलताना अभिजात मराठी भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर आयोजित पहिला सप्ताह साजरा होत असताना आपण मराठी भाषा समृद्ध होण्यासाठी सप्ताहात एक तरी पुस्तक वाचणे आवश्यक आहे. मराठी साहित्याला संस्कृतीला अनेक संत –साहित्यिक यांची मोठी परंपरा आहे. त्यांचे आपण पाईक आहोत. आपण आपल्या दैनंदिन वाचन आणि लिखाणातून ही मराठी भाषा आणखी समृद्ध करावी असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी कवि चंद्रकांत पालवे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक संचालिका शिल्पा रसाळ, स्वागत किरण अग्रवाल तर ग्रंथपाल अमोल इथापे यांनी आभार मानले. यावेळी मेहता पब्लिकेशनच्या पुस्तकाचे प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. हे प्रदर्शन १८ ऑक्टोबर पर्यंत सुरू राहणार आहे. वेळ सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत तसेच कार्यक्रमात उपस्थित दादा चौधरी शाळेतील विद्यार्थी व उपस्थितांना पुस्तके देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी वाचनालयाचे कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# इंटरनेटवर एखादी गोष्ट अगदी मोफत मिळत असेल, तर लक्षात ठेवा तुम्ही तिथे ग्राहक नाही, तर तुम्ही स्वतःच तिथली विक्रीची वस्तू आहात

### प्रा. रवींद्र देवढे यांचे प्रतिपादन; रेसिडेन्शिअल ज्युनियर कॉलेजमध्ये 'सायबर सुरक्षा जागरूकता' व्याख्यान



रेसिडेन्शिअल ज्युनियर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांसाठी सायबर गुन्हे आणि सुरक्षा या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रमात सायबर क्राईम विभागाचे पोलीस उपनिरीक्षक सुदाम काकडे, प्राचार्य विजय जाधव, प्रा. दादासाहेब वांढेकर आदी.

नगर – आजचे तरुण रोज नवनवीन मोफत ॲप्स, गेमिंग आणि सोशल मीडियाचा वापर करत आहेत. आपल्याला वाटते की हे सर्व मोफत आहे, पण त्या बदल्यात आपण कंपन्यांना आपली अत्यंत मौल्यवान अशी 'प्रायव्हसी' (खाजगी माहिती) देत आहोत. लेखक युव्हाल नोव्हा हरारी यांनी म्हटल्याप्रमाणे, जर तुम्हाला इंटरनेटवर एखादी गोष्ट अगदी मोफत मिळत असेल, तर लक्षात ठेवा तुम्ही तिथे ग्राहक नाही, तर तुम्ही स्वतःच तिथली विक्रीची वस्तू आहात, असे प्रतिपादन कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वागत व प्रास्ताविक करताना प्रा. रवींद्र देवढे यांनी केले.

महाराष्ट्र सायबर सेल, मुंबई आणि अहिल्यानगर सायबर पोलीस स्टेशन यांच्या निर्देशानुसार, 'ऑक्टोबर सायबर सुरक्षा जागरूकता महिना' मोहिमेअंतर्गत येथील रेसिडेन्शिअल ज्युनियर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांसाठी सायबर गुन्हे आणि सुरक्षा या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान झाले. व्याख्यान अहिल्यानगर सायबर क्राईम विभागाचे पोलीस उपनिरीक्षक सुदाम काकडे यांनी दिले. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून कॉलेजचे प्राचार्य विजय जाधव, उपप्राचार्य प्रा. दादासाहेब वांढेकर व प्रा. वैभव लोंढे लाभले होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा. रवींद्र देवढे यांनी स्वागत केले व युव्हाल नोव्हा हरारी यांच्या पुस्तकातील तरुणांना दिलेला इशारा आवर्जून सांगितला.

### कोविडनंतर मुलांच्या संदर्भातील सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ

कार्यक्रमात पोलीस उपनिरीक्षक सुदाम काकडे यांनी सायबर विश्वातील विविध धोके आणि फसवणुकीच्या नवीन पद्धतींवर सविस्तर प्रकाश टाकला. कोविड काळापासून मुलांच्या हातात मोबाईल आल्यानंतर मुलांशी संबंधित सायबर गुन्हे आणि 'सायबर बुलिंग' सारखे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. सायबर गुन्हेगारांचे 'सिंडिकेट' (जाळे) जगभर पसरलेले असून, ते लोकांची आवड–निवड आणि मानसिकतेचा अभ्यास करून फसवणूक करतात. इंटरनेटवरून कोणतीही गोष्ट कधीही पूर्णपणे डिलीट होत नसल्याने, सोशल मीडियाचा वापर करताना स्वतःची वैयक्तिक माहिती अत्यंत काळजीपूर्वक हाताळावी, असा सल्ला त्यांनी दिला.

### नवीन सायबर फ्रॉडस्पासून सावध राहा

गुन्हेगारांचे नवनवीन फंडे सध्या बाजारात 'डिजिटल अरेस्ट' (जो पूर्णपणे खोटा प्रकार आहे), 'बॉस स्कॅम', आणि परदेशात नेऊन फसवणूक करणारे 'सायबर स्लेव्ह' सारखे गंभीर प्रकार सुरू आहेत.

### इन्व्हेस्टमेंट आणि शेअर मार्केट फ्रॉड

व्हॉटस्ॲप किंवा टेलिग्राम ग्रुपवर +९, +४ सारख्या आंतरराष्ट्रीय क्रमांकांचे ॲडमिन असलेल्या ग्रुपमध्ये ॲड करून, बनावट ॲप्सद्वारे अवाजवी फायद्याचे आमिष दाखवून कोट्यवधींची फसवणूक केली जाते. यात 'म्युल अकाउंटस्'चा वापर केला जातो.

### APK फाईल्सचा धोका

मोबाईलवर येणाऱ्या संशयास्पद लिंक्सवर क्लिक करू नका. अनोळखी APK फाईल्स डाऊनलोड केल्यास फोनमधील डेटा आणि OTP थेट गुन्हेगाराकडे जातो. यासाठी मोबाईलमधील 'ऑटो डाऊनलोड' सेटिंग बंद ठेवावी.

### मानसिक व शारीरिक आरोग्य जपा

ऑनलाईन गेमिंगवर भारतात बंदी आहे. रील्स पाहून काहीही मिळत नाही, उलट भ्रम निर्माण होतो. फॉलोअर्स वाढवण्याच्या फंदात न पडता स्क्रीन टाईम कमी ठेवावा. विद्यार्थ्यांनी आधी कष्ट करून स्वतःची खरी ओळख निर्माण करावी.

### दोन तासांच्या आत तक्रार केल्यास पैसे परत मिळण्याची शक्यता अधिक!

सायबर आर्थिक फसवणूक झाल्यास पहिल्या दोन तासांच्या आत (Golden Hours) केंद्र सरकारच्या १९३० किंवा १९४५ या राष्ट्रीय हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा किंवा www.cybercrime.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी. वेळेत तक्रार केल्यास पैशांची रिकव्हरी होण्याची संधी जास्त असते, अशी महत्त्वपूर्ण माहिती यावेळी देण्यात आली.

या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कॉलेजच्या पर्यवेक्षिका सौ. वैशाली दरकुंडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. धनंजय लाटे, प्रा. मोहन कांजवणे, प्रा. म्हस्के, प्रा. गदादे, प्रा. जगधने, प्रा. कापसे, प्रा. सौ. दळवी, जोंधळे, प्रा. नेब, प्रा. पवार आणि प्रा. सानप यांनी परिश्रम घेतले. या प्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



केशवराव गाडीलकर हायस्कूलमध्ये आयोजित 'सजग विद्यार्थी ग्राहक अभियान'

# केशवराव गाडीलकर हायस्कूलमध्ये 'सजग विद्यार्थी ग्राहक अभियान' उत्साहात

### ऑनलाइन खरेदीतील फसवणुकीपासून सावध राहण्याचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

नगर – ग्राहक पंचायत महाराष्ट्र, अहमदनगर जिल्हा शाखेच्या वतीने केशवराव गाडीलकर हायस्कूलमध्ये 'सजग विद्यार्थी ग्राहक अभियान' आयोजित करण्यात आले. या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ग्राहकांचे हक्क, ऑनलाइन खरेदी करताना घ्यावयाची काळजी, ग्राहकांची होणारी फसवणूक तसेच फसवणूक झाल्यास करावयाची कारवाई आणि तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया याविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय सोनार, जिल्हा सहसचिव संजय जोशी, महिला संघटिका सौ. शलाका रसाळ आणि महानगर सदस्य सर्वोत्तम क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी उपस्थितांनी ऑनलाइन खरेदी करताना वस्तूची गुणवत्ता, किंमत, विक्रेत्याची विश्वासार्हता आणि खरेदीच्या अटी तपासण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. ऑनलाइन व्यवहारांमध्ये होणारी फसवणूक ओळखणे, वैयक्तिक माहिती व ओटीपी सुरक्षित ठेवणे, ग्राहक म्हणून आपल्या हक्कांची जाणीव ठेवणे आणि अन्याय झाल्यास योग्य ठिकाणी तक्रार दाखल करणे याविषयीही मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वतः सजग ग्राहक बनून आपल्या कुटुंबात आणि समाजात ग्राहक जागृतीचा संदेश पोहोचवावा, असे आवाहनही करण्यात आले.

कार्यक्रमाला विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल गायकवाड तसेच इतर शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सौ. जयश्री देशपांडे यांनी केले.

# भूकंपामध्ये इमारत नेमकी कुठेकुठे कमकुवत असते?

## बीम, कॉलम, सांधे, भिंती आणि पायामधील कमकुवत जागा समजून घेऊया

भूकंप झाला की लोकांचा पहिला प्रश्न असतो, इमारत पडते नेमकी कशी?

प्रत्यक्षात इमारत एका क्षणात अचानक पडत नाही. बहुतांश वेळा नुकसान काही कमकुवत ठिकाणांपासून सुरू होतं. आधी तडे दिसतात, काही भाग जास्त हलतात, काही सांधे कमजोर पडतात, आणि मग हळूहळू मोठं structural नुकसान वाढत जातं.

म्हणून एक गोष्ट नीट समजून घेतली पाहिजे.

भूकंपात संपूर्ण इमारत एकदम अपयशी ठरत नाही, तर तिच्यातले काही भाग आधी कमकुवत पडतात.




### १) बीम - कॉलम सांधा हा सर्वात महत्त्वाचा भाग असतो

इमारतीत जिथे बीम आणि कॉलम एकमेकांना जोडलेले असतात, त्या जागेला beam-column joint म्हणतात. भूकंपाच्या वेळी हा भाग खूप महत्त्वाचा ठरतो. कारण इमारत हलताना सगळ्यात जास्त ताण अनेकदा याच सांध्यावर येतो. जर या भागात योग्य detailing नसेल, stirrups पुरेसे नसतील, किंवा काँक्रीटचं काम नीट झालेलं नसेल, तर joint कमकुवत पडू शकतो.

बाहेरून इमारत ठीक दिसली तरी तिच्या आतला हा सांधा कमजोर असेल, तर तो मोठा धोका असतो. साध्या भाषेत सांगायचं तर, joint मजबूत नसेल तर इमारतीचा सांगाडाच डळमळू शकतो.

### २) कॉलम कमकुवत पडला तर धोका जास्त वाढतो

इमारतीत बीम आणि कॉलम दोन्ही महत्त्वाचे असतात. पण कॉलम हा इमारतीचा मुख्य आधार असतो.

बीमला तडे गेले तरी काही प्रमाणात इमारत उभी राहू शकते. पण कॉलम गंभीरपणे कमकुवत पडला, तर संपूर्ण मजला धोक्यात येऊ शकतो. म्हणूनच कॉलमची रचना, त्यातलं स्टील, त्याचं detailing आणि त्याची quality याकडे विशेष लक्ष द्यावं लागतं.

कॉलम शक्य तितका मजबूत असावा, जेणेकरून इमारत अचानक कोसळणार नाही.

### ३) शॉर्ट कॉलम इफेक्ट हा लपलेला धोका असतो

कधी कधी खिडक्या अर्ध्या बंद असतात, एखाद्या भिंतीमुळे कॉलमचा काही भागच मोकळा राहतो, किंवा पातळीत फरक असतो. अशा वेळी पूर्ण कॉलमऐवजी त्याचा कमी उंचीचा भागच हालचाल सहन करतो. याला short column effect म्हणतात.

भूकंपाच्या वेळी अशा कॉलममध्ये जास्त shear तयार होतो आणि अचानक तडे पडू शकतात. ही समस्या बाहेरून लगेच लक्षात येत नाही, पण अनुभवी स्ट्रक्चरल इंजिनिअरला हा धोका समजू शकतो.

### ४) ओपन पार्किंग किंवा मोकळा खालचा मजला धोकादायक ठरू शकतो

आजकाल अनेक इमारतींमध्ये खाली parking साठी मोकळी जागा ठेवली जाते आणि वरच्या मजल्यांवर भिंती व खोल्या असतात. दिसायला ही रचना चांगली वाटते, पण भूकंपाच्या वेळी खालचा मजला तुलनेने जास्त कमकुवत ठरू शकतो. याला soft storey effect म्हणतात. वरचा भाग stiff असतो आणि खालचा भाग comparatively जास्त flexible असतो. त्यामुळे भूकंपाच्या वेळी जास्त हालचाल खालच्या मजल्यावर होते आणि नुकसानही तिथेच सुरू होण्याची शक्यता वाढते. Parking साठी मोकळी जागा ठेवायची असेल, तर डिझाईन अधिक काळजीपूर्वक करावं लागतं.

### ५) भिंतींमधले तडे आपल्याला खूप काही सांगतात

भूकंपानंतर अनेक घरांमध्ये तडे दिसतात. पण प्रत्येक तडा सारखा नसतो. काही तडे फक्त plaster मध्ये असतात. काही विटांच्या भिंतींमध्ये तिरपे दिसतात. काही door-window च्या कोपऱ्याजवळ दिसतात, तर काही beam-column joint जवळ दिसतात.

* फक्त finishing damage आहे का
* भिंतींवर जास्त ताण आला आहे का
* frame मध्ये हालचाल झाली आहे का
* settlement आहे का
* मोठं structural distress सुरू आहे का

म्हणून तडे दिसले म्हणजे लगेच घाबरण्याची गरज नाही. पण ते पूर्णपणे दुर्लक्षितही करू नयेत.

### ६) अनियमित आकाराच्या इमारती जास्त जोखमीच्या ठरू शकतात

सरळ, साधा आणि संतुलित प्लॅन असलेली इमारत भूकंपात तुलनेने चांगली कामगिरी करू शकते. पण L-shape, T- shape, खूप projections, एका बाजूला जास्त वजन, एका बाजूला कमी भिंती, अचानक setbacks किंवा वेगवेगळ्या उंचीचे भाग असलेली इमारत भूकंपात अधिक ताण सहन करू शकते. अशा irregular इमारतींमध्ये torsion आणि uneven movement वाढतो. त्यामुळे काही भागांवर जास्त ताण येतो आणि नुकसान uneven पद्धतीने होतं. दिसायला वेगळी इमारत करायला हरकत नाही, पण तिचं structurehr तितकंच विचारपूर्वक असलं पाहिजे.

### ७) चुकीचं detailing आतून मोठी समस्या निर्माण करतं

इमारत बाहेरून खूप छान दिसू शकते. पण आतल्या reinforcement detailing मध्ये चूक असेल, तर तो मोठा धोका असतो.

* stirrups जास्त अंतरावर ठेवणे
* lap चुकीच्या ठिकाणी देणे
* anchorage योग्य न देणे
* beam-column joint मध्ये confinement कमी ठेवणे
* steel कमी-जास्त करणं
* drawing प्रमाणे काम न करणं

या चुका कागदावर छोट्या वाटतात. पण भूकंपाच्या वेळी त्याच चुका मोठं नुकसान करू शकतात. भूकंपात इमारतीचं खरं वर्तन तिच्या detailing वर मोठ्या प्रमाणात अवलंबून असतं.

### ८) पाया आणि जमिनीची भूमिका देखील तितकीच महत्त्वाची आहे

काही वेळा नुकसान वर दिसत असलं, तरी मूळ कारण खाली असू शकतं. जर foundation योग्य नसेल, जमिनीची bearing capacity नीट समजली नसेल, पाण्याचा परिणाम असेल किंवा settlement झालं असेल, तर भूकंपाच्या वेळी ही समस्या आणखी गंभीर होऊ शकते. म्हणून पाया हा फक्त खालचा भाग नसून संपूर्ण इमारतीच्या सुरक्षिततेचा खरा आधार असतो.

### ९) नंतर केलेले बदलही धोकादायक ठरू शकतात

बऱ्याच वेळा घर तयार झाल्यानंतर काही बदल केले जातात:

* भिंती काढणे
* मोठी opening घेणे
* अतिरिक्त मजला बांधणे
* मोठी पाण्याची टाकी वाढवणे
* column भोवती छेडछाड करणे
* beam खाली जागा मोकळी करणे

हे बदल मनाने केले, तर मूळ structural system बदलतो आणि भूकंपाच्या वेळी धोका वाढतो.

घरात structural बदल करायचे असतील, तर आधी शपसळपशशी चा सल्ला घेणं खूप गरजेचं आहे.

### १०) जुन्या इमारतींमध्ये कोणत्या गोष्टींकडे लक्ष द्यावं?

* वारंवार वाढणारे तडे
* कॉलम किंवा बीममध्ये दिसणारे cracks
* slab खाली वाकल्यासारखं वाटणं
* दारं-खिडक्या अडकायला लागणं
* भिंती आणि कॉलमच्या जोडावर gap येणं
* पाया बसल्यासारखी चिन्हं
* वरचा मजला नंतर वाढवलेला असणं

अशा वेळी काही होत नाही असं म्हणून दुर्लक्ष करू नये. वेळीच structural तपासणी केली, तर मोठं नुकसान टाळता येऊ शकतं.

### ११) स्ट्रक्चरल इंजिनिअरकडे कधी जावं?

* भूकंपानंतर तडे दिसले असतील जुन्या घरात बदल करायचे असतील अतिरिक्त मजला वाढवायचा असेल
* open parking किंवा अनियमित प्लॅन असेल
* beam-column joints बद्दल शंका असेल
* पाया किंवा settlement बाबत प्रश्न असतील
* नवीन बांधकाम सुरू करण्यापूर्वी सुरक्षिततेबाबत खात्री हवी असेल

वेळीच घेतलेला सल्ला म्हणजे भविष्यातील धोका कमी करणं.

**शेवटी एकच लक्षात ठेवा :** भूकंपात इमारत अचानक अपयशी होत नाही. तिच्यातील काही कमकुवत भाग आधी समस्या निर्माण करतात. त्यामुळे भूकंपरोधक बांधकाम म्हणजे फक्त जाड कॉलम किंवा जास्त स्टील नव्हे.

त्यासाठी गरज असते :

* योग्य नियोजन
* योग्य स्ट्रक्चरल डिझाईन
* योग्य डिटेलिंग
* चांगलं साहित्य
* कामाची नीट देखरेख
* अनुभवी स्ट्रक्चरल इंजिनिअर

इमारतीची खरी सुरक्षितता बाहेरून दिसत नाही, पण तिच्या प्रत्येक सांध्यात, कॉलममध्ये, detailing मध्ये आणि पायामध्ये दडलेली असते.

**निष्कर्ष :** भूकंपात सर्वात जास्त नुकसान तेथेच होतं, जिथे इमारतीत आधीच कमकुवतपणा असते, म्हणून इमारत पडली एवढंच पाहण्यापेक्षा ती कुठे कमकुवत पडली हे समजून घेणं अधिक महत्त्वाचं आहे. कारण योग्य वेळी योग्य गोष्ट समजली, तर उद्याचं नुकसान आजच टाळता येतं. भूकंपाच्या वेळी इमारतीची परीक्षा होते, पण तिची तयारी आधीच केलेली असावी लागते.

**लेखक: इंजि. सलिम मासूम शेख.** Mo - 8888227786
(My Bhoomi Consultants)
B.E. Civil, M- Tech Structures
Chartered Engineer, MISSE, MIE, MIV
Off. : Durga Residency, In front of Yashodanagar
Kaman, Savedi Ahilyanagar. Contact : 7721000042.



AESA
Architects, Engineers & Surveyors Association Ahilyanagar






# अहिल्यानगरमध्ये विचार भारतीच्यावतीने नवरात्रोत्सवात 'सामूहिक श्रीसूक्त पठण, कुंकुमार्चन, संकीर्तन अभियान'

## श्री नवदुर्गा सन्मानाचे आयोजन

नगर - आदिशक्तीच्या आराधनेचा, शक्तितत्त्वाच्या उपासनेचा आणि मंगलमय साधनेचा पवित्र उत्सव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून नगरच्या विचार भारतीच्या वतीने सामूहिक श्रीसूक्त पठण, कुंकुमार्चन, संकीर्तन अभियान आणि श्री नवदुर्गा सन्मान आशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ११ ते १९ ऑक्टोबर दरम्यान नगर शहरात विविध भागांमध्ये हा धार्मिक उपक्रम राबवण्यात येणार आहे, अशी माहिती नवरात्रोत्सव प्रमुख पुष्कर कुलकर्णी यांनी दिली.



अधिक माहिती देताना सचिव मनोज झंवर म्हणाले, नवरात्री-निमित्त विचार भारतीचा श्रीसूक्त पठाण व कुंकुमार्चन व नवदुर्गा सन्मान सोहळ्याचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे - ११ ऑक्टोबर रोजी रासने नगर मधील रासनेनगर मधील दुर्गा माता मंदिरातील कार्यक्रमात क्रीडापटू कोमल वाकळे यांच्या सन्मान, १२ ऑक्टोबर रोजी पटवर्धन चौकातील गौरी घुमट येथील कार्यक्रमात कलाक्षेत्रातील सुरेखा डावरे यांचा सन्मान, १३ ऑक्टोबर रोजी केडगाव वेस येथे सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्या मनीषा गुगळे यांचा सन्मान, १४ ऑक्टोबर रोजी मंगलगेट येथे नगरसेवक सागर मुर्तडकर आयोजित कार्यक्रमात यशस्वी व्यवसायिक कविता जैन यांचा सन्मान, १५ ऑक्टोबर रोजी बुरुडगाव येथे उपसरपंच महेश निमसे आयोजित कार्यक्रमात शैक्षणिक क्षेत्रातील संध्या गायकवाड यांचा सन्मान, १६ ऑक्टोबर रोजी बुरानगरच्या तुळजाभवानी देवी मंदिरात वैद्यकीय क्षेत्रातील कार्याबद्दल डॉ.तेजस्वी जुनागडे यांचा सन्मान, १७ ऑक्टोबर रोजी भिंगार विजयनगर येथे उद्योजिका वैशाली गांधी यांचा सन्मान, १८ ऑक्टोबर रोजी विनायक नगर वैष्णोदेवी मित्र मंडळ येथे उद्योजिका मेघना मुनोत यांचा सन्मान तसेच १९ ऑक्टोबर रोजी उद्योजिका भूपाळी निसळ यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

देवीच्या भक्ती बरोबरच भजन संस्काराचा आणि संस्कृतीचा वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचण्यासाठी नवरात्र उत्सवात संकीर्तन अभियान विचार भारतीय हाती घेतले आहे. हे अभियान १९ ऑक्टोबर पर्यंत नगर शहरातील विविध मंडळांमध्ये तसेच विविध भागांमधील नागरिकांच्या घरी राबविण्यात येणार आहे, अशी माहिती संकीर्तन अभियान प्रमुख दिपाली डीडवाणीया यांनी दिली.

या उपक्रमासाठी भावना लांडगे, मंदाकिनी गायकवाड, चंद्रकांत तागड, राजेंद्र पाचे आदी नियोजन करत आहेत.

अधिक माहितीसाठी ९२८४८७७५१५ येथे संपर्क साधावा, असे आवाहन अध्यक्ष सुधीर लांडगे यांनी केले आहे.

# बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी ११ ऑक्टोबरला नगरमध्ये 'करिअर मार्गदर्शन' परिसंवाद

नगर - बारावीनंतर पुढे काय? इंजिनिअरिंग, मेडिकल व इतर विविध क्षेत्रांमधील करिअरच्या संधी नेमक्या कोणत्या? यांसारख्या अनेक प्रश्नांवर विद्यार्थी व पालकांना योग्य मार्गदर्शन करून दिशा देण्यासाठी नगर शहरात एका विशेष मोफत करिअर मार्गदर्शन परिसंवादाचे आयोजन पुण्याच्या एम.आय.टी-ए. डि.टी युनिव्हर्सिटीच्या वतीने करण्यात आले आहे. ॲडमिशन सजेशनच्या सहकार्याने होणारा हा कार्यक्रम ११ ऑक्टोबर रोजी सावेडीच्या माऊली सभागृहात सकाळी १०:३० वाजता होणार आहे.

या चर्चासत्रात एमआयटी-एडिटी युनिव्हर्सिटीचे व ॲडमिशन सजेशनचे अनुभवी तज्ज्ञ व प्राध्यापक विद्यार्थ्यांना व पालकांना करियर संदर्भात मार्गदर्शन करणार आहेत. यामध्ये प्रा. डॉ. राजेश जाधव, प्रा. अजयकुमार उगले, अभियांत्रिकी समुपदेशक अक्षयकुमार भंडारी व वैद्यकीय समुपदेशक प्रा. सचिन कोथिंबीरे आदी उपस्थित राहणर आहेत. हे तज्ज्ञ उपस्थितांना बारावीनंतरच्या करिअरच्या संधी व दिशा, अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे आणि भविष्यातील संधी, विविध शिष्यवृत्ती योजनांची माहिती, १२ वी बोर्ड परीक्षेच्या तयारीची प्रभावी रणनीती, नामांकित महाविद्यालये व संस्थांची निवड आणि वैयक्तिक करिअर समुपदेशन आदींचे मार्गदर्शन करणार आहेत. या मोफत चर्चासत्राचा पालकांनी व विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा.

# लहान मुलांसाठी अहिल्यानगरमध्ये 'किडस् गरबा नाईट २०२६'चे आयोजन

नगर - नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने लहान मुला-मुलींसाठी खास 'किडस् गरबा नाईट २०२६ - सीझन ३'चे आयोजन करण्यात आले आहे. कोहिनूर मॉल, डान्स युनिव्हर्स इन्स्टिट्यूट आणि नृत्य आस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम होणार आहे.

१९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ ते ९ या वेळेत सावेडी येथील कोहिनूर मॉलच्या एट्रियममध्ये हा कार्यक्रम होणार आहे. या विशेष गरबा नाईटमध्ये ३ ते १५ वर्षे वयोगटातील मुले-मुली पारंपरिक गरबा व दांडिया नृत्याचा आनंद घेणार आहेत. नृत्य, दांडिया, मनोरंजन, स्पर्धा आणि उत्साहाने परिपूर्ण असा हा कार्यक्रम होणार आहे.

कार्यक्रमापूर्वी १२ ते १८ ऑक्टोबरदरम्यान लहान मुलांसाठी पाच दिवसांची विशेष गरबा-दांडिया कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. ही कार्यशाळा सावेडी येथील प्रोफेसर चौकातील डान्स युनिव्हर्स इन्स्टिट्यूटच्या स्टुडिओमध्ये सायंकाळी ५ ते ६ आणि ६ ते ७ अशा दोन सत्रांमध्ये होणार आहे. कार्यशाळेसाठी ३ ते ५ वर्षे वयोगटातील टॉडलर्स, ६ ते १० वर्षे वयोगटातील सब-ज्युनिअर आणि ११ ते १५ वर्षे वयोगटातील ज्युनिअर असे गट करण्यात आले आहेत.

गरबा नाईटमध्ये उत्कृष्ट वेशभूषा, उत्कृष्ट गरबा सादरीकरण, उत्कृष्ट दांडिया सादरीकरण, गरबा प्रिन्स, गरबा प्रिन्सेस, उत्कृष्ट द्वयी सादरीकरण तसेच मुलगा व मुलगी अशा गटांमध्ये विशेष विजेतेपदाची पारितोषिके देण्यात येणार आहेत. सर्व सहभागी मुलांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमासाठी नोंदणी अनिवार्य असून, इच्छुक पालकांनी आपल्या पाल्यांची नावे लवकरात लवकर नोंदवावीत, असे आवाहन आयोजक डान्स युनिव्हर्स इन्स्टिट्यूटचे संचालक सागर अलचेट्टी यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९६३७१३९५५२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## नोटीस उत्तर व हरकत

प्रति,
ॲड. तनवीर एम. शेख
रा. कस्तुरी प्लाझा शेजारी, डावरे गल्ली, अहिल्यानगर
२. श्री.श्लोक गणेश पतके
रा.फ्लॅट नं. २०२, साईकुंज अपार्टमेंट, पोलीस चौकीजवळ, गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर

यांसी.. ..

आमचे अशिल **श्रीमती सुनिता अशोक गांधी व श्रीमती शितल राहुल गांधी** दोघीही रा.महाजन गल्ली, अहिल्यानगर यांनी सांगितलेवरून व दिलेल्या माहितीवरुन सदर नोटीस उत्तर व हरकतीने तुम्हास ॲड. सुधीर बी.बाफना,अहिल्यानगर यांचेमार्फत सदर नोटीस उत्तराने कळविण्यात येते की,

तुम्ही दि.०५/१०/२०२६ रोजीच्या दै.नवा मराठा या वर्तमानपत्रात पान नं.८ वर ॲड. तनवीर एम. शेख व ॲड.फरहान असीफ शेख, अ.नगर यांचेमार्फत अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे सावेडी येथील स.नं.९४/सी मधील प्लॉट नं.१ चे क्षेत्र ५१८.०० चौ.मी. चे व्यवहारा संदर्भात जाहीर नोटीस प्रसिध्द केली. सदरची नोटीस आमचे अशिल श्रीमती सुनिता अशोक गांधी व श्रीमती शितल राहुल गांधी यांचे वाचण्यात आली. त्यानुसार सदर जाहीर नोटीस उत्तराने कळवितो की, सदरील मिळकत या आमचे अशिलाचे मुलगा व पती कै.राहुल अशोक गांधी यांनी श्री.श्लोक गणेश पतके यांचेशी सदर मिळकतीबाबत नोटरी साठेखताचा दस्त केला होता, त्या दस्तान्वये श्री.श्लोक पतके यांनी विसार म्हणून मोठी रक्कम स्विकारली होती. सदर व्यवहार रद्द करण्यासाठी श्री.श्लोक पतके यांनी आमचे पक्षकारा (मुलगा व पती ) बरोबर दि.२८/०१/२०२५ रोजी ॲड. विक्रम वाडेकर नोटरी पब्लिक, अ.नगर यांचेसमोर नोटरी दस्त क्र.८३/२०२५ अन्वये दस्त केला होता. सदर दस्तानुसार श्री.श्लोक पतके यांनी आमचे पक्षकाराचे (मुलगा व पती) यांना बँक ऑफ इंडिया शाखा अहमदनगर या बँकेचे धनादेश क्र.४५३०४५, ४५३०४६, ४५३०४८ असे दिले होते. सदर धानदेश बँकेत भरल्यास रोख होतील असा विश्वास व खात्री श्री.श्लोक पतके यांनी दिली होती. परंतु सदर धनादेश रोख न झाल्याने आमचे पक्षकाराचे (मुलगा व पती) यांनी श्री.शलोक पतके यांचे विरुध्द अहमदनगर येथील फौजदारी न्यायालयात फौजदारी केस क्र.७९७६/२०२५ दाखल केलेली असून त्याचे कामकाज प्रलंबित आहे. सदर मिळकतीमध्ये आमचे पक्षकार यांचा कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबत श्री.श्लोक पतके यांना माहिती व कल्पना असून देखील त्यांनी सदर मिळकतीची बेकायदेशीररित्या विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत व त्या अनुषंगाने जाहीर नोटीस प्रसिध्द केलेली आहे, सदर मिळकतीच्या विक्री अथवा कोणत्याही मार्गाने हस्तांतर करण्यास आमचे अशिल यांची सक्त हरकत आहे. आमचे अशिलाचा हक्क, हिस्सा डावलण्याच्या हेतुने सदरील मिळकतीची विक्री करण्याचा प्रयत्न सुरु आहे त्यामुळे सदरील मिळकतीबाबत श्री.श्लोक पतके यांचेबरोबर कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये, केल्यास सदर व्यवहार आमचे अशिलावर व मिळकतीवर मुळीच बंधनकारक राहणार नाही. तसेच आमचे पक्षकार संबंधित व्यक्तींविरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करतील याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होऊ नये याची नोंद घ्यावी म्हणून सदरील जाहीर नोटीसीस जाहीर उत्तर दिले असे.

कळावे, येणेप्रमाणे नोटीस उत्तर व हरकत दिली असे.

दि.१०/१०/२०२६, अहमदनगर

**ॲड. सुधीर बी. बाफना**
बी-२, निलायम हौसिंग सोसायटी विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहमदनगर मो. ९८२२४९४९२१

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टत वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक **श्री. हेमंत ऊर्फ हेमंतकुमार हरिभाऊ उगले रा. जय मल्हार नगर, जामखेड, तालुका जामखेड, जि.अहिल्यानगर** यांच्या मालकीची व कब्जे वहिवाटीची असून सदर मिळकतीचा आमचे अशिल यांचे बरोबर खरेदीचा व्यवहार ठरला असून, सदर मिळकतीच्या खरेदीपोटी आमच्या अशिलाने विद्यमान मालक यांना विसारापोटी रक्कम दिलेली आहे. विद्यमान मालक यांनी सदरची मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजा विरहित, तसेच सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार व हितसंबंध नसल्याबाबतची खात्री व भरवसा दिला आहे. तथापि सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, तोंडी, अथवा लेखी करार, खरेदीखत, साठेखत, लिज, इजमेंट, मनाईहुकूम, बक्षीस, वारस हक्क, ॲटचमेट, खासगी अथवा सरकारी, निमसरकारी बोजा असल्यास कोणत्याही स्वरुपात हक्क अधिकार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध होताच ७ दिवसांच्या आत कागदोपत्री पुराव्यासह खाली दिलेल्या पत्यावर कळवावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, असे समजून अथवा असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे. असे गृहित धरून व सदर मिळकत ही निर्वेध, निजोखीम आहे, असे ग्राहय धरून आमचे अशिल हे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन**- अहिल्यानगर महानगरपलिका हद्दीतील मौजे माळीवाडा येथील सर्व्हे नंबर १४६ मधील प्लॉट नंबर १५/१६ चे एकूण क्षेत्रफळ ४२०.00 चौरस मीटर यावर आर.आर.सी.पद्धतीचे बांधकाम झालेल्या ''वृंदावन अपार्टमेंट '' या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका (फ्लॅट) नंबर ८ चे बिल्टअप क्षेत्रफळ ४६.९३ चौरस मीटर व यामधील इलेक्ट्रिक लाईट मीटर व लाईट फिटिंग व नळ कनेक्शनसह संपूर्ण मिळकत.

यांसी चतु:सिमा खालील प्रमाणे : खालील प्रमाणे

पुर्वेस - फ्लॅट नंबर ७ व ओपन डक्ट दक्षिणेस - ओपन टू स्काय
पश्चिमेस - ओपन टू स्काय उत्तरेस - फ्लॅट नंबर ७ व जिना

येणेप्रमाणे चतु:सिमा पूर्वक फ्लॅट मिळकत, त्यामधील वस्तूसह काही एक राखून न ठेवता, येणे जाणे च्या हक्कासह तसेच पार्किंगसह असे.

**ॲड. सचिन चंद्रकांत फुलसौंदर**
ऑफिस- तळ मजला, आनंद हाईट्स,
जुने जिल्हा न्यायालयासमोर, अहिल्यानगर. मो. नं. ९९२२२२७१७८

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचा विक्री व्यवहार आमचे अशिलांबरोबर होणार आहे व व्यवहाराची बोलणी चालु आहे. सदर मिळकत निर्वेध निजोखमी व बोजाविरहित आहे असे विद्यमान मालकाचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ **दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हांस कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार करतील; मग कोणाचीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी.

**हि नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. १०/१०/२०२६**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

**मिळकत वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी नगरपैकी, महानगरपालिका हद्दीतील, मौजे सावेडी येथील नगर-मनमाड रोड वरील संजोग हॉटेल मागील खालील वर्णनाची मिळकत-

तसेच खाली नमुद मिळकतीस मा. सहाय्यक संचालक नगररचना अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर यांचेकडील तारीख ११/०९/२०२६ रोजीचे अप्रुव्हल क्रमांक डीडीएमसीएन/एलटी/२०२६/एपीएल/००६७७ अन्वये रेखांकनास तात्पुरत्या स्वरुपाची मंजुरी मिळालेली आहे व अंतिम मंजुरीच्या वेळेस सदर प्लॉट क्षेत्र एकत्रिकरण होवुन त्याचे क्षेत्र सुमारे १000.0 चौ.मी. राहील -

| अ. | सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| | | हे.आर | रु.पै |
| | २५२/४इ | 0.0५ | 0.५0 |
| | | (५00.00 चौ.मी) | |

विद्यमान मालक नंबर १ महेश बाळासाहेब वाकळे यांच्या मालकीची मिळकत.

| ब. | सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ | आकारणी |
|---|---|---|---|
| | | हे. आर | रु.पै |
| | २५२/४ड | 0.0५ | 0.५0 |
| | | (५00.00 चौ.मी) | |

विद्यमान मालक नंबर २ संदीप दत्तात्रय वाकळे व नंबर ३ सतीश दत्तात्रय वाकळे यांच्या मालकीची मिळकत.

**विद्यमान मालकांचे नाव**

**१.श्री. महेश बाळासाहेब वाकळे २.श्री.संदीप दत्तात्रय वाकळे ३.श्री.सतीश दत्तात्रय वाकळे,** सर्व रा. लक्ष्मी सदन, वाकळे पाटील फॉर्म हाऊस सावेडी, अहिल्यानगर ४१४००१

**ॲड. आर. टी. शर्मा**
**ॲड. अंकिता अनिल शर्मा (पगारिया)**
पत्ता- ऑफीस नं. १४,१७ पहिला मजला
श्री आनंद कॉम्प्लेक्स, दाळमंडई, अहिल्यानगर, मो. ९४२२२२०८४५,




# ...म्हणून दुखतं डोकं

कुठे चुकतो आपण?

डोकेदुखी ही सर्वसाधारणपणे आढळणारी समस्या. ताणतणाव, अपुरी झोप, थकवा अशा कारणांमुळे डोकं दुखू शकतं. यासोबतच काही अन्नपदार्थांच्या सेवनामुळेही डोकेदुखीचा त्रास जाणवू शकतो. आपण अनवधनाने आहार-विहाराशी संबंधित बऱ्याच चुका करतो. डोकेदुखीला कारणीभूत ठरणाऱ्या काही अन्नपदार्थांविषयी...



* कॅफेनच्या अतिसेवनामुळे डोकं दुखू शकतं. तसंच चहा, कॉफीसारख्या पदार्थांचं सेवन अचानक बंद केल्यास त्रास होऊ शकतो. त्यामुळे चहा, कॉफीचं सेवन मर्यादित प्रमाणात करावं.

* साखरेला पर्याय म्हणून सुक्रालोज, सॅकरिन, एससल्फेमसारखे घटक वापरले जातात. अशा घटकांच्या अतिसेवनामुळे डोकं दुखू शकतं. त्यामुळे कृत्रिम गोड पदार्थांचं सेवन टाळणं योग्य ठरतं.

* अल्कोहोलमुळे शरीरात पाण्याची कमतरता निर्माण होते. त्यामुळे नियमित मद्यपान करणाऱ्यांना डोकेदुखीचा त्रास होतो. डोकेदुखी टाळण्यासाठी मद्यपानावर नियंत्रण आणणं गरजेचं आहे.

* चॉकलेटचं अतिसेवनही त्रासदायक ठरू शकतं. चॉकलेटमध्ये कोकोचं प्रमाण कमी असतं. तसंच यात टायरामीन, कॅफेनसारखे घटकही असतात. यामुळे डोकं दुखू शकतं.

# डोळ्यांमध्ये डाग आहेत?

व्याधी विचार

डोळ्याच्या पांढऱ्या भागावर अचानक लाल रंगाचा डाग दिसला, की अनेकांना घाबरायला होते. डोळ्यात रक्त साचले आहे किंवा रक्ताची गाठ झाली आहे, असे वाटू शकते; मात्र डोळ्यावर दिसणारा प्रत्येक लाल डाग गंभीर आजाराचे लक्षण असेलच असे नाही. काही वेळा ही साधी रक्तवाहिनी फुटल्यामुळे झालेली किरकोळ समस्या असते; पण काही परिस्थितींमध्ये डोळ्याच्या आतल्या भागात रेटिनाला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिनीत अडथळा निर्माण होऊ शकतो. ही स्थिती गंभीर असून वेळेत उपचार न मिळाल्यास दृष्टी कायमची कमी होण्याचा धोका असतो.

डोळ्याच्या पांढऱ्या भागावर चमकदार लाल रंगाचा डाग दिसत असेल आणि त्यासोबत वेदना किंवा दृष्टी कमी होण्याची समस्या नसेल, तर अनेकदा ही डोळ्याच्या वरच्या पातळ थराखालील रक्तवाहिनी फुटल्यामुळे झालेली रक्तस्रावाची स्थिती असते. याला 'सबकंजंक्टायव्हल हॅमरेज' म्हणतात. अशा प्रकारचा रक्तस्राव दिसायला खूप गंभीर वाटतो; मात्र बहुतांश वेळा तो धोकादायक नसतो.

डोळ्याच्या पांढऱ्या भागावर लाल डाग दिसण्यामागे ही सामान्य कारणांपैकी एक आहे. जोरात शिंकणे, सतत किंवा जोराचा खोकला येणे, उलटी होणे, वजन उचलताना जास्त जोर लावणे किंवा डोळ्याला किरकोळ दुखापत होणे यामुळेही डोळ्यातील बारीक रक्तवाहिनी फुटू शकते.



उच्च रक्तदाब, मधुमेह, रक्त गोठण्याशी संबंधित समस्या असलेले लोक किंवा रक्त पातळ ठेवण्यासाठी औषधे घेणाऱ्या व्यक्तींमध्ये अशी समस्या दिसण्याची शक्यता जास्त असू शकते. याउलट डोळ्याच्या आत असलेल्या रेटिनाच्या रक्तवाहिनीत अडथळा निर्माण झाला तर परिस्थिती गंभीर असू शकते. रेटिनाला रक्तपुरवठा करणारी रक्तवाहिनी किंवा रक्त परत नेणारी शीर बंद झाल्यास डोळ्याच्या दृष्टीवर थेट परिणाम होतो. 'रेटिनल व्हेन ऑक्लूजन' म्हणजे रेटिनातून रक्त बाहेर नेणाऱ्या शिरेत अडथळा निर्माण होणे. याचा वय वाढणे, उच्च रक्तदाब, मधुमेह, वाढलेले कोलेस्ट्रॉल आणि ग्लॉकोमा यांसारख्या समस्यांशी संबंध असू शकतो.

रेटिनाला रक्तपुरवठा करणारी धमनी अचानक बंद झाल्यास त्याला 'रेटिनल आर्टरी ऑक्लूजन' म्हणतात. यामुळे अचानक आणि वेदना न होता दृष्टी कमी होऊ शकते. काही वेळा याला 'आय स्ट्रोक' असेही म्हटले जाते. ही स्थिती शरीरातील रक्तवाहिन्यांशी संबंधित इतर गंभीर समस्येचा इशाराही असू शकते.

**रेटिनाच्या रक्तवाहिनीत अडथळा आल्यास लक्षणे**

अचानक दृष्टी धूसर होणे

हळूहळू दृष्टी कमी होणे.

वस्तू वाकड्या किंवा वेगळ्या दिसणे.

डोळ्यांसमोर काळे ठिपके किंवा तरंगणारे डाग दिसणे.

दृष्टीचा काही भाग कमी होणे

एका डोळ्याची पूर्ण किंवा अंशतः दृष्टी जाणे.

डोळ्यांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी केवळ डोळ्यांची काळजी घेणे पुरेसे नाही. संपूर्ण शरीराचे आरोग्य नियंत्रणात ठेवणे महत्त्वाचे आहे.

रक्तदाब नियंत्रणात ठेवा.

रक्तातील साखर नियंत्रणात ठेवा.

कोलेस्ट्रॉलची पातळी वाढू देऊ नका.

धूम्रपानाची सवय असल्यास ती सोडण्याचा प्रयत्न करा.

नियमित शारीरिक हालचाल आणि व्यायाम करा.

वेळोवेळी डोळ्यांची तपासणी करून घ्या.

# उच्च रक्तदाबाचा यकृतावरही परिणाम

आरोग्यवेध

डॉ. गोविंद भोसले

उच्च रक्तदाबाला अनेकदा 'सायलेंट किलर' म्हटले जाते. कारण हा आजार फक्त हृदयावरच परिणाम करत नाही, तर हळूहळू यकृतालाही नुकसान पोहोचवतो. अनेक वेळा लोक त्याची लक्षणे थकवा, ताणतणाव किंवा वाढत्या वयाशी जोडून दुर्लक्ष करतात. एका अभ्यासानुसार उच्च रक्तदाब असलेल्यांना 'लिव्हर फायब्रोसिस'चा धोका जास्त असतो. मेटाबॉलिक सम स्येमुळे फॅटी लिव्हरची समस्या असलेल्यांमध्ये हा धोका आणखी वाढतो.

**सतत थकवा आणि सुस्ती**

पुरेशी विश्रांती घेतल्यानंतरही शरीर थकल्यासारखे वाटत असेल किंवा नेहमीच सुस्ती जाणवत असेल तर हे यकृतावरील ताणाचे लक्षण असू शकते. उच्च रक्तदाबामुळे यकृताचे काम बिघडते आणि शरीरातील ऊर्जानिर्मिती आणि पोषक तत्वांचे नीट शोषण होत नाही. हा थकवा साध्या थकव्यापेक्षा वेगळा असतो.

**पोटात वेदना**

उजव्या बाजूच्या वरच्या पोटात वेदना किंवा जडपणा जाणवणे हे यकृतात सूज किंवा लिव्हर वाढल्याचे लक्षण असू शकते. बरेचदा लोक अपचन किंवा गॅसचा त्रास मानून याकडे दुर्लक्ष करतात; मात्र अल्ट्रासाऊंडसारख्या तपासण्यांमुळे वेळेत लिव्हर एन्लार्जमेंट ओळखता येते आणि गंभीर नुकसान टाळता येऊ शकते.

**पिवळेपणा आणि त्वचेतील बदल**

त्वचा किंवा डोळ्यांमध्ये थोडासा पिवळसरपणा दिसणे हे यकृत बिघडल्याचे स्पष्ट संकेत आहे. उच्च रक्तदाबामुळे यकृताच्या समस्या वाढू शकतात आणि त्यातून बिलिरुबिनची पातळी वाढते. त्वचेतील अगदी हलके रंगबदलही दुर्लक्षित करू नयेत.

# कानांचेही आरोग्य जपा

काळजी घ्या

सकाळी प्रवासात, ऑफिसच्या कामात, जिममध्ये किंवा रात्री झोपण्यापूर्वीही कानात इअरफोन असणे आज अनेकांच्या रोजच्या आयुष्याचा एक भागच झाला आहे. 'थोडा वेळच तर वापरतोय' असं म्हणत अनेक जण तासन् तास मोठ्या आवाजात गाणी ऐकतात किंवा व्हिडीओ पाहतात. सुरुवातीला याचा काही त्रास जाणवत नसला, तरी हळूहळू कानात आवाज घुमणे, कमी ऐकू येणे, कान दुखणे किंवा संसर्ग होण्यासारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे आवडत्या गाण्यांसोबत आपल्या कानांचे आरोग्य जपणेही गरजेचे आहे.



आज इअरफोन आणि इअरबड्स आपल्या दैनंदिन जीवनाचा एक अविभाज्य भाग झाले आहेत. प्रवासात गाणी ऐकणे, ऑनलाइन मिटींग्ज, मोठ्या आवाजात व्हिडीओ पाहणे किंवा फोनवर बोलणे यासाठी अनेक जण दररोज इअरफोन आणि इअरबड्सचा वापर करतात. तासनतास इअरफोन किंवा इअरबड्स वापरणे, मोठ्या आवाजात ऐकणे आणि कानांच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष करणे यामुळे कानांच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे इअरफोन आणि इअरबड्सचा वापर किती आणि कसा करावा, याबाबत काळजी घेणे गरजेचे आहे.




# स्टेथोस्कोपमधील 'एआय' शोधतो १५ सेंकदात आजार

नवसंशोधन

डॉ. कुंदन गायकवाड

तंत्रज्ञान आणि आरोग्यसेवेचा समन्वय आता पूर्वीपेक्षाही जलद झाला आहे. आता स्टेथोस्कोपमध्येही कृत्रिम बुद्धिमत्ते(एआय) ने प्रवेश केला आहे. रुग्णांचे आरोग्य योग्यरित्या पाहण्यासाठी हे नवीन तंत्रज्ञान डॉक्टरांना खूप उपयुक्त ठरत आहे. विशेष म्हणजे आता फक्त १५ सेकंदात अनेक आजार शोधता येतात.

**'एआय' स्टेथोस्कोप कसा काम करतो?**

या स्मार्ट स्टेथोस्कोपमध्ये सेन्सर्स आणि 'एआय अल्गोरिदम' आहेत. डॉक्टर तो रुग्णाच्या छातीवर किंवा पाठीवर ठेवतात आणि श्वास ऐकतात तेव्हा ते आवाज रेकॉर्ड करतात. 'एआय' त्या आवाजाचे विश्लेषण करते आणि रुग्णाला हृदय, फुफ्फुस किंवा इतर अवयवांच्या आजाराचा धोका आहे की नाही, हे काही सेकंदात सांगते.

**कोणते आजार शोधता येतात?**

'एआय स्टेथोस्कोप'ने काही मोठे आजार लवकर शोधता येतात. त्यामुळे हृदयाचा आवाज, हृदयविकाराचा झटका, हृदय अपयशाचे संकेत मिळतात. त्याचबरोबर दमा, ब्रॉंकायटिस, फुफ्फुसात पाणी होणे आदीबाबत ते माहिती देते. उच्च रक्तदाब किंवा अडथळा, संसर्ग आणि दाह आदींची माहिती ते देते. पूर्वी, डॉक्टर रुग्णाचा श्वास ऐकून किंवा छातीची तपासणी करून रोगाचे निदान करण्यासाठी काही मिनिटे किंवा तास घेत असत. 'एआय स्टेथोस्कोप'द्वारे ही प्रक्रिया फक्त १५ सेकंदात पूर्ण होते. त्यामुळे वेळ आणि मेहनत दोन्ही वाचतात. याशिवाय, सुरुवातीच्या टप्प्यात रोग आढळल्यास उपचार जलद आणि सोपे होतात. 'एआय स्टेथोस्कोप' डॉक्टरांना मदत करते; परंतु ते त्यांची जागा घेऊ शकत नाही. विशेषज्ञ डॉक्टर सहज उपलब्ध नसलेल्या ठिकाणी, विशेषतः दुर्गम आणि ग्रामीण भागात हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरु शकते.

**भविष्यातील शक्यता**

'एआय'च्या या वापरामुळे, आरोग्यसेवेमध्ये रिअल-टाइम देखरेख आणि चांगले अंदाज मिळवणे शक्य आहे. भविष्यात, हे तंत्रज्ञान अधिक स्मार्ट होईल आणि स्वयंचलित अहवाल आणि डेटा विश्लेषणदेखील करेल. स्टेथोस्कोपमध्ये 'एआय'चा प्रवेश आरोग्यसेवेसाठी एक क्रांतिकारी बदल आहे. यामुळे डॉक्टरांना रोग लवकर, अचूक आणि सुरुवातीच्या टप्प्यात ओळखण्यास मदत होते. आता फक्त १५ सेकंदात रुग्णाच्या आरोग्याचे मूल्यांकन करणे शक्य आहे, जेणेकरून उपचार लवकर सुरु करता येतील आणि रुग्णांचे प्राणही वाचू शकतील.

# कोलेस्टेरॉल वाढतंय?

आरोग्यमंत्र

'हाय कोलेस्टेरॉल' आरोग्यासाठी धोकादायक मानलं जातं. कारण शरीरातील कोलेस्टेरॉलची पातळी वाढल्यास हाय ब्लड प्रेशर, मधुमेह, हार्ट अटॅक, कोरोनरी आर्टरी डिजीज आणि ट्रिपल वेसल डिजीज यांसारख्या समस्यांचा धोका वाढू शकतो. परिस्थिती गंभीर झाल्यास जीवावरही बेतू शकते; मात्र शरीरातील प्रत्येक प्रकारचं कोलेस्टेरॉल वाईट नसतं. शरीरात 'गुड कोलेस्टेरॉल' म्हणजेच 'एचडीएलचीही गरज असते. यामुळे शरीरातील निरोगी पेशी तयार होण्यास मदत होते; पण 'बॅड कोलेस्टेरॉल' म्हणजेच एलडीएलचं प्रमाण वाढल्यास वेळीच सावध होणं गरजेचं आहे.

रक्तातील बॅड कोलेस्टेरॉलची पातळी वाढल्यास ते हळूहळू रक्तवाहिन्यांच्या आतील भागात जमा होऊ शकतं. त्यामुळे रक्तवाहिन्या अरुंद होऊ लागतात आणि रक्तप्रवाहात अडथळा निर्माण होतो. अशा वेळी हृदयाला रक्त पुरवण्यासाठी जास्त मेहनत घ्यावी लागते. त्यामुळे हार्ट अटॅकसारख्या गंभीर समस्यांचा धोका वाढू शकतो. हाय कोलेस्टेरॉलची लक्षणं अनेकदा थेट दिसून येत नाहीत. त्यामुळे अनेकांना त्याची माहितीच नसते. यासाठी 'लिपिड प्रोफाइल टेस्ट' करून कोलेस्टेरॉलची पातळी तपासली जाते; मात्र शरीराच्या काही भागांमध्ये सतत किंवा तीव्र वेदना होत असतील तर त्याकडे दुर्लक्ष करू नये.



रक्तातील बॅड कोलेस्टेरॉलचं प्रमाण वाढल्यास जांघ, कंबर आणि पोटऱ्यांच्या स्नायूंमध्ये वेदना होऊ शकतात. काही जणांना या भागांमध्ये गोळे येणं किंवा तीव्र आकडी येण्याचाही त्रास होऊ शकतो. रक्तवाहिन्यांमध्ये अडथळा निर्माण झाल्यास फक्त हृदयापर्यंतच नाही, तर शरीराच्या इतर भागांपर्यंतही रक्त पोहोचण्यात अडचण येऊ शकते. विशेषतः पायांमध्ये रक्तप्रवाह कमी झाल्यास त्या भागाला पुरेसा ऑक्सिजन मिळत नाही. त्यामुळे जांघ, कंबर आणि पोटऱ्यांमध्ये वेदना होऊ शकतात. ही समस्या 'पेरिफेरल आर्टरी डिजीज' म्हणजेच पायांच्या रक्तवाहिन्यांशी संबंधित आजाराचा संकेत असू शकते.

जांघ, कंबर किंवा पोटऱ्यांमध्ये तीव्र वेदना होत असतील तर चालणं-फिरणं, रोजची सामान्य शारीरिक कामं करणं किंवा जिने चढणंही कठीण होऊ शकतं. अशा परिस्थितीत डॉक्टरांचा सल्ला घेऊन कोलेस्ट्रॉलची पातळी तपासणं महत्त्वाचं आहे. यासाठी लिपिड प्रोफाइल टेस्ट केली जाते. या रक्त तपासणीत शरीरातील कोलेस्ट्रॉलची पातळी तपासता येते.

हाय कोलेस्ट्रॉलमुळे पायांमधील रक्तप्रवाहावर परिणाम झाल्यास पुढील लक्षणे दिसू शकतात - पाय आणि तळपायांमध्ये तीव्र वेदना होणे, पाय सुन्न पडणे, पाय थंड पडणे, पायांच्या नखांचा रंग पिवळसर होणे, पायांच्या बोटांना सूज येणे, पायांमध्ये अशक्तपणा जाणवणे, पायांच्या त्वचेचा रंग बदलणे.

# लाभदायी पदाभ्यंग

आयुर्वेदात पायांना प्रचंड महत्त्व आहे. आपले पाय शरीराचा आधारस्तंभ आहेत. म्हणूनच त्यांची नीट काळजी घ्यायला हवी. पायाच्या नसांना आराम द्यायला हवा. यासाठी आयुर्वेदात पदाभ्यंग नावाचा मसाज



आयुर्वेद आणि विकार

सांगितला आहे. हा मसाज अत्यंत आरामदायी आहे. आयुर्वेदिक तेलांनी पायांना मसाज केल्यामुळे नसांवरचा ताण कमी होतो आणि पर्यायाने सर्वांगिण आरोग्य सुधारतं. पायांना मसाज केल्यानंतर संपूर्ण शरीरातल्या अवयवांना आराम मिळतो. पदाभ्यंग रात्री झोपण्याआधी करण्याचा मसाज आहे. दररोज पदाभ्यंग केल्यामुळे अनेक लाभ मिळतात. पदाभ्यंगामुळे शरीरातल्या त्रिदोषांचं संतुलन साधलं जातं. पदाभ्यंगामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते. यामुळे प्रतिकारशक्तीशी संबंधित आजारांना आळा घालता येतो. पदाभ्यंगामुळे मानसिक ताणतणाव, अस्वस्थता, भीती, काळजी या मानसिक आजारांची तीव्रता कमी होते. मानसिक शांतता लाभते. निद्रानाशाची समस्या असेल तर पदाभ्यंग करून घेता येईल. पदाभ्यंगामुळे रक्ताभिसरण सुधारतं, दृष्टिदोष दूर होतात, श्रवणशक्ती सुधारते.

# साधे बदलही देतात हृदयविकाराचे संकेत

हृदयविकाराचा झटका म्हटले, की सर्वांत आधी डोळ्यासमोर येते ते छातीत दुखणे. मात्र महिलांच्या बाबतीत हृदयविकाराचा झटक्याची लक्षणे नेहमीच स्पष्ट दिसतील असे नाही. काही वेळा शरीरात जाणवणारे अगदी साधे बदलही हृदयाशी संबंधित गंभीर समस्येचे संकेत असू शकतात. काही महिलांमध्ये हृदयविकाराचा झटका येण्याच्या काही आठवडे आधीपासूनच अशी लक्षणे दिसू शकतात.



जाणून घ्या

'नॅशनल हार्ट फेल्युअर रजिस्ट्री' (एनएचएफआर) नुसार, 'हार्ट फेल्युअर'मुळे रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांपैकी जवळपास एक तृतीयांश महिला आहेत. भारतात महिलांमधील हृदयाच्या आजारांचे निदान अनेकदा उशिरा होते. हृदयरोग हा महिलांच्या मृत्यूचे एक महत्त्वाचे कारण आहे. हृदयविकाराचा झटक्याच्या लक्षणांकडे ७० टक्क्यांहून अधिक महिला दुर्लक्ष करतात. महिलांमध्ये दिसणारी ही लक्षणे अनेकदा नेहमीपेक्षा वेगळी असू शकतात. त्यामुळे हृदयविकाराचा झटका येण्यापूर्वी दिसणारे 'रेड फ्लॅग' कोणते आणि हार्ट अटॅकचा धोका कमी करण्यासाठी कोणती काळजी घ्यावी, हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

महिलांमध्ये हृदयविकाराच्या झटक्याची लक्षणे अनेकदा फार तीव्र नसतात. त्यामुळे त्या लक्षणांकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता जास्त असते. थकवा, ताणतणाव, वाढते वय, मेनोपॉज किंवा रोजच्या धावपळीमुळे शरीर थकले असेल असे समजून अनेक महिला ही लक्षणे दुर्लक्षित करतात. काही वेळा ही लक्षणे गॅस, ॲसिडिटी, चिंता किंवा तणावाशी संबंधित असल्याचेही मानले जाते. परिणामी डॉक्टरांकडे जाण्यास उशीर होतो. हृदयविकाराचा झटक्याच्या वेळी उपचार मिळण्यास झालेला हा विलंब हृदयाच्या स्नायूंना अधिक नुकसान पोहोचवू शकतो आणि त्यातून बरे होण्यासही अधिक वेळ लागू शकतो.

उच्च रक्तदाब, लठ्ठपणा, मधुमेह, शारीरिक हालचालींचा अभाव, जास्त मीठ, प्रक्रिया केलेले पदार्थ खाणे, नियंत्रणात नसलेला ताण हे महिलांमध्ये हार्ट अटॅकचा धोका वाढवणारे काही प्रमुख घटक आहेत.

नवसंशोधन

### धूम्रपानामुळे



धूम्रपानामुळे होणाऱ्या दुष्परिणामांबद्दल आपण जाणतो. धूम्रपानामुळे शारीरिक आरोग्य धोक्यात येतच, शिवाय मानसिक आरोग्यावरही दुष्परिणाम होतात. एका संशोधनातून ही बाब समोर आली आहे. धूम्रपान, नैराश्य आणि चिंता यांच्यातला परस्परसंबंध दाखवून देणारा शोध नुकताच प्रसिद्ध झाला आहे. म्हणजे धूम्रपानामुळे आपलं मानसिक आरोग्य धोक्यात येऊ शकतं. धूम्रपान करणारे लोक नैराश्याला बळी पडण्याची शक्यता दुपटीने अधिक असल्याचं या संशोधनातून समोर आलं आहे. यामुळे धूम्रपानाचं प्रमाण कमी करणं गरजेचं आहे.

दंतारोग्य

### मुलांचे दात येताना

दात येणं हा प्रत्येक बाळाच्या शारीरिक जडणघडणीतला महत्त्वाचा टप्पा मानला जातो. काही मुलं दात येण्याच्या प्रक्रियेतून सहज तरून जातात तर काही मुलांना खूप त्रास होतो. दात येण्याआधी काही मुलांच्या हिरड्या सुजतात. काहींना हिरड्यांमध्ये वेदना जाणवतात. यामुळे बाळ अस्वस्थ होतं. म्हणूनच या काळात मुलं रडतात, चिडचिड करतात. त्यांना भूक लागत नाही. काही मुलं झोपतही नाहीत. त्यामुळे या काळात मुलांची विशेष काळजी घेणं गरजेचं आहे.



जपणूक त्वचेची

### वय वाढल्याच्या खुणा...



वय वाढल्याच्या खुणा त्वचेवर दिसू लागतात. खाद्यतेलापासून आहारातले विविध घटक त्वचेच्या आरोग्यावर परिणाम करतात. वय वाढल्याच्या खुणांमुळे त्वचा निस्तेज दिसू लागते. आपली त्वचा नैसर्गिक तजेला हरवून बसते. यामुळे हाडं आणि नसा दिसू लागतात. ही समस्या दूर करण्यासाठी भरपूर पाणी प्या. ग्रीन टीमुळेही त्वचेला तजेला मिळू शकतो. पोषक आहार, फळांचं सेवनही उपयुक्त ठरू शकतं. चिया सीड्स तसंच ॲव्हाकॅडोमुळेही त्वचेला आवश्यक पोषण मिळतं.

आजीबाईचा बटवा

### लाभदायी मखाणे



मखाणे खूप आरोग्यदायी आहेत. त्याच्या नियमित सेवनामुळे विविध प्रकारच्या आजारांपासून मुक्ती मिळू शकते. मखाण्यांमध्ये फॅट्सचं प्रमाण बरंच कमी तर फायबरचं प्रमाण बरंच जास्त असतं. सोडियमही बरंच कमी असतं. सकाळी उठल्यानंतर रिकाम्या पोटी मखाणे खाल्ल्यामुळे रक्तातली साखर नियंत्रणात राहू शकते. मखाणे हृदयाच्या आरोग्यासाठीही चांगले आहेत. यासोबतच बद्धकोष्ठता, निद्रानाश अशा विकारांवरही ते उपयुक्त ठरतात.

## देवी महात्म्य...
# घटस्थापना आणि मातीचा घट

शारदीय नवरात्राची मंगल प्रभात होते ती घरातल्या देव्हाऱ्यात एका अलौकिक मंगलमय धार्मिक भावनेने ज्याला आपण 'घटस्थापना' म्हणतो.

प्रत्येकाच्या घरात देवीची पितळी, चांदीची किंवा पाषाणाची सुंदर मूर्ती आधीपासूनच असते. नित्यनेमाने आपण तिची पूजाही करतो. मग नवरात्राच्या नऊ दिवसांत केवळ त्या मूर्तीची पूजा न करता, आवर्जून खाली माती पसरून त्यावर पाण्याचा घट (कलश) का बसवला जातो? बाकी देवांची पूजा वर्षभर चालू राहते, पण देवीच्या पूजेतच हे घट मांडणे आणि दहाव्या दिवशी त्याचे विसर्जन करणे एवढे अनिवार्य का मानले गेले आहे. याबाबत उपलब्ध असलेली माहिती अशी आहे की,,

'घटस्थापना म्हणजे काय?' आणि 'मातीचा घटच का हवा?', यामागील सनातन पुराणे, लोकपरंपरा आणि सृजनाचे गूढ आध्यात्मिक तत्त्वज्ञान असे आहे.

दुर्गा सप्तशती आणि श्रीमद् देवी भागवतात अत्यंत विस्मयकारक प्रसंग येतो. जेव्हा महिषासुराने इंद्रादि देवांचा दारुण पराभव करून त्यांना स्वर्गातून हाकलून दिले, तेव्हा त्रस्त झालेले सर्व देव ब्रह्मा, विष्णू आणि महादेवांकडे धावले. महिषासुराला वरदान होते की, त्याचा वध कोणताही पुरुष, दैत्य किंवा देव करू शकणार नाही; त्याला केवळ एक स्त्रीच मारू शकेल. हे ऐकून भगवान शंकरांच्या मुखातून क्रोधाग्नीचे प्रचंड तेज बाहेर पडले. पाठोपाठ ब्रह्मदेव, विष्णू, इंद्र आणि सर्व देवांच्या शरीरातून त्यांची मूळ शक्ती आणि तेज बाहेर फेकले गेले. सर्व देवांचे हे व्यक्तिगत तेज एकत्र येऊन अंतराळात एका महाकाय, प्रखर आणि अथांग अग्निपर्वतासारखा तेजाचा झोत तयार झाला. हे तेज इतके प्रचंड, तीव्र आणि ज्वलंत होते की ते कोणत्याही एका साध्या मूर्तीत किंवा पाषाणात सामावणे अशक्य होते. ते आदि-अनादी, निराकार, अमूर्त आणि अव्यक्त होते.

या अनिर्बंध वैश्विक तेजाला एका ठिकाणी स्थिर करण्यासाठी, त्याचे नियमन करण्यासाठी आणि त्याला शांत रूप देण्यासाठी देवांनी मध्यभागी वरुणदेवांचा मंत्रपूत जल भरलेला कलश स्थापित केला. पाण्यामध्ये अग्नी आणि प्रचंड वैश्विक ऊर्जेला स्वतःमध्ये शांतपणे सामावून घेण्याची अद्वितीय क्षमता असते.



त्या पवित्र जलात आणि कलशाच्या आधारे ते महातेज हळूहळू घनरूप (सगुण) झाले आणि त्यातून अष्टभुजा साक्षात जगन्माता भगवती महालक्ष्मी/दुर्गा प्रकट झाली! त्यामुळे नवरात्रात देवीच्या आवाहनापूर्वी तो 'घट' (ऊर्जेचे मूळ केंद्र) स्थापन केला जातो. कारण देवी ही कोणत्याही एका विशिष्ट मानवी रूपात बद्ध नसून, ती विश्वाची मूळ, ज्वलंत वैश्विक ऊर्जा आहे. त्या ऊर्जेला आधी घटात सामावून घेतले जाते. लोकपरंपरेत आणि शाक्त पंथात घट मांडण्यामागे स्त्रीशक्ती आणि गर्भाशयाचे अत्यंत पवित्र रहस्य सांगितले गेले आहे.

ऋग्वेदातील हिरण्यगर्भ सूक्तात आणि पुराणांत सांगितले आहे की, सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वी सर्वत्र केवळ अंधकार आणि अनंत जल (कारणावस्थेतील पाणी) पसरले होते. त्या अथांग जलातून एक सुवर्ण अंडी/कलश प्रकट झाला, ज्याला 'हिरण्यगर्भ' म्हटले गेले. त्या हिरण्यगर्भातूनच सर्व सृष्टी, ग्रह, तारे आणि जीवसृष्टी जन्माला आली. देवी ही जगाची केवळ पालनकर्ता नाही, तर ती विश्वाची जन्मदात्री 'जगन्माता' आहे. शास्त्रात मातीचा घट हा साक्षात स्त्रीच्या गर्भाशयाचे प्रतीक मानला गेला आहे. ज्याप्रमाणे मातेच्या गर्भाशयात जीवनद्रव्य असते आणि त्यात बीजाचे रोपण होऊन एका नव्या जीवाचा अंकुर फुटतो; अगदी तसेच घटस्थापनेची रचना असते,

मातीची वेदी : साक्षात योनी / भूमी (पृथ्वी तत्त्व).

मातीचा घट : स्त्रीचे गर्भाशय (मातृत्वाचे अधिष्ठान).

कलशातील पाणी : गर्भातील जीवनद्रव्य (अमृतमय प्राणतत्व).

सप्तधान्याचे बी : सृष्टीचा जिवंत अंकुर.

जगात बाकी सर्व देवता हे पालक किंवा संहारक असू शकतात, पण आदिशक्ती ही साक्षात 'सृजन' (निर्मिती) करणारी माता आहे. आणि निर्मितीची पूजा ही केवळ स्थिर दगडी मूर्ती ठेवून होत नाही, तर प्रत्यक्ष बीजाला मातीत अंकुर फुटताना पाहून - 'जिवंत निर्मिती डोळ्यांनी अनुभवून' होते! म्हणूनच घटाखाली माती पसरून त्यात धान्य रुजवले जाते. धातूंचे (तांबे, पितळ, सोने) कलश पूजेत चालत असले, तरी शास्त्रात आणि तंत्रमार्गात 'मातीचा कच्चा घट' सर्वोत्तम मानला गेला आहे. यामागे सूक्ष्म विज्ञान आहे : मातीचा घट हा निसर्गातील पाचही तत्त्वांनी बनतो - माती (पृथ्वी), पाणी (जल), उन्हात सुकवणे (वायू-आकाश) आणि भट्टीत भाजणे (अग्नी). हा देह ज्या पंचतत्त्वांचा बनला आहे, त्याचे साक्षात रूप म्हणजे मातीचा घट.

मातीचे भांडे सच्छिद्र असते. त्यातून जलाचे सूक्ष्म पाझरणे आणि बाष्पीभवन सतत होत राहते. त्यामुळे नऊ दिवस घटातील ऊर्जा, मंत्रांची स्पंदने आणि अखंड दिव्याचे तेज एकत्र येऊन वातावरणातील सर्व नकारात्मकता शोषून घेतली जाते आणि घरात सकारात्मक 'बायो-एनर्जी' स्थिर राहते. बाकी देवांची पूजा आपण वर्षभर मूर्तीच्या सगुण रूपात करतो. परंतु नवरात्रातील देवीची साधना ही 'आवाहन ते विसर्जन' अशी एक परिपूर्ण आध्यात्मिक यात्रा असते.

पहिल्या दिवशी घटात वेद आणि पुराणातील मंत्रांद्वारे ब्रह्मांडातील त्या महाशक्तीला साद घातली जाते. माती, पाणी, आंब्याची पाने आणि नारळ यांच्या संयोगातून त्या अमूर्त, निराकार शक्तीला घटाच्या रूपात एक मंगल 'सगुण आकार' दिला जातो. दररोज घटावर फुलांची नवी माळ चढवली जाते आणि खाली मातीत पेरलेल्या धान्याला कोंब फुटून ते हिरवेगार होताना पाहिले जाते. म्हणजेच देवीची सृजनशक्ती प्रत्यक्ष जिवंत रूपात, आपल्या डोळ्यांसमोर प्रतिदिन वाढताना आपण अनुभवतो. ही निसर्गाच्या वाढीची, पोषणाची पूजा असते.

(विजयादशमीला) ९ महिषासुराचा वध होऊन जेव्हा सृष्टीचा समतोल पुन्हा प्रस्थापित होतो, तेव्हा कार्य संपवून ती सगुण शक्ती पुन्हा आपल्या मूळ स्वरूपात - म्हणजेच अमूर्त पंचतत्त्वांत विलीन होते. म्हणून त्या घटाचे आणि धान्याच्या रूपाने वाढलेल्या देवीचे कृतज्ञतापूर्वक विसर्जन केले जाते.

घट हे आपल्या मानवी शरीराचेही प्रतीक आहे. जोपर्यंत घटात पाणी (प्राण) आहे, तोपर्यंत त्यात चैतन्य आहे. स्वामी समर्थ हे या घटामधील प्राणतत्त्व आणि बाहेर पसरलेले परब्रह्म दोन्ही एकच आहेत हे दाखवून देतात. घटाची स्थापना करताना साधकाने मनात हा भाव ठेवावा की, ज्याप्रमाणे हा मातीचा घट त्या प्रचंड तेजाला शांतपणे स्वतःमध्ये सामावून घेतो, त्याचप्रमाणे आपल्या या देहरूपी घटातही काम, क्रोध, लोभ या विकारांचे दमन होऊन भगवतीचे सात्त्विक तेज स्थिर व्हावे.

बाकी सर्व देवतांची पूजा ही त्यांच्या 'रूपाची' पूजा असते; तर नवरात्रातील घटस्थापना ही विश्वाच्या 'उत्पत्तीची, मातृत्वाची आणि प्रत्यक्ष जीवंत चैतन्याची' पूजा असते. घटाशिवाय देवीची निर्मितीशक्ती डोळ्यांनी पाहताच येत नाही, म्हणूनच केवळ मूर्ती न ठेवता आपल्या पूर्वजांनी अत्यंत विचारपूर्वक 'घटस्थापनेची' ही दिव्य परंपरा सुरू केली आहे.



- संकलन -
**रमेश देशपांडे**
९४२३७९३२२६



## गुरुवाणी - ७६
## कृतज्ञता भाव...

तीर्थंकरांची साधना, तप, आराधना, दृष्टी यात काय अंतर आहे? तीर्थंकर जितके जाणवतात तितके बोलत नाहीत. कारण बोलण्याला मर्यादा असतात. यासाठी सुधर्मा स्वामी कायम उपमा अलंकारात तीर्थंकरांचे वर्णन करतात. जैन भूगोल, जीवशास्त्र समजून घेतले पाहिजे. जितके समुद्र आहेत, त्यात बाहेरून पाणी येतं. समुद्रात जसे पाणी येईल तसे ते बनतात. स्वयंभू रमण समुद्र हा असा समुद्र आहे ज्यात पाणी येत नाही. पाण्याचा कोणताही स्त्रोत नाही. इंद्रभूती गौतमने याविषयी भगवान महावीरांना विचारले तेव्हा त्यांनी अद्भुत उत्तर दिले. 'स्वयंभू रमण समुद्रावर जितके आकाश आहे, तिथले बाष्प या समुद्रात जाऊन पाणी होते. बाहेरून पाणी येत नाही'. सुधर्मा स्वामी म्हणतात, तीर्थंकरांची तप साधना ही स्वयंभू रमण समुद्रासारखी आहे. परमात्म्याच्या पारण्याचा जिथे जिथे उल्लेख आहे, त्यात पाण्याचा उल्लेख येत नाही. पारणा करताना तर सगळ्यांना पाणी जास्त लागते. पण तीर्थंकर बिगर पाण्याचा पारणा करतात. कारण ते स्वयंभू रमण समुद्रासारखे आहेत. तुमच्या मनात कृतज्ञता असेल तरच उपकारीची भावना लक्षात येईल. उपकार विसरणारे कृतज्ञ नसतात. जिन शासन सांगते, 'कृतज्ञ असाल तरच सम्यक दृष्टी आहे'. जो कृतज्ञ असतो तोच धार्मिक असतो. नागकुमारांमध्ये धरणेंद्र श्रेष्ठ आहे, कारण तो उपकारीला विसरत नाही. तो कृतज्ञ आहे. पार्श्वनाथ भगवानांनी अडचणीत आल्यावर धरणेंद्रला बोलावले नाही. पण कृतज्ञ असलेला धरणेंद्र स्वतःच्या उपकारीसाठी स्वतःहून धावून आला. श्रीकृष्ण सुदामाचे कच्चे पोहे आनंदाने खातात. श्रीकृष्ण दुर्योधनाकडील मिष्टान्न भोजन नाकारून विदुराच्या घरी जातो. तिथे विदुराची पत्नी इतकी भारावून जाते की, केळी स्वतः खाऊन सालपट श्रीकृष्णाला खायला देते. तिचे भान हरपलेले असते. हे पाहून विदुर ओरडतो व ती भानावर येते. ती श्रीकृष्णाला केळे देते. तेव्हा श्रीकृष्ण म्हणतो, जो स्वाद सालपटात होता तो स्वाद केळीमध्ये नाही. तीर्थंकरांचे तप जाणून घ्यायचे तर धरणेंद्रचा कृतज्ञता भाव समजून घेतला पाहिजे. धरणेंद्र स्वतःच्या स्तुतीने आनंदीत नाही होत तर भगवान पार्श्वनाथ यांच्या स्तुतीने आनंदीत होतो. आपल्याला कोणाची प्रशंसा आवडते? स्वतःची की भगवंताची, गुरूंची? उपकारीला विसरणे कृतघ्नपणा असतो. शब्दांत भक्तीचे स्पंदन नाही ते शब्द मृतवत असतात. ते कितीही सुंदर असले तरी ते जाळलेच पाहिजे. सुधर्मा स्वामींच्या विरत्थुईची एका ओळीची जरी अनुभूती आली तरी तुमचे जीवन धन्य होईल.

- उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

# जय आनंद महावीर युवक मंडळाच्या वतीने नगरमध्ये 'पाणी बचत काळाची गरज' विषयावर खुली निबंध स्पर्धा



नगर - एल निनोच्या प्रभावामुळे सध्या सर्वत्र दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाअभावी पाण्याचे दुर्भिक्ष जाणवत असून येत्या काळात दुष्काळाची दाहकता तीव्र होऊ शकते. या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन आणि काटकसरीने वापर आवश्यक ठरत आहे. नगर शहरातही महानगरपालिकेने पाणी कपात जाहीर केली आहे. दुष्काळी परिस्थितीशी दोन हात करताना प्रत्येकाने पाणी बचत करणे आवश्यक असून याबाबत जनजागृती करण्यासाठी जय आनंद महावीर युवक मंडळाने पाणी बचत काळाची गरज या विषयावर खुल्या निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत यांनी दिली.

मंडळाचे कार्याध्यक्ष सत्येन मुथा आणि सेक्रेटरी आनंद मुथा यांनी सांगितले की, यावर्षी पावसाने ओढ दिल्याने सर्वत्र दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. ग्रामीण भागात आतापासूनच पाणी टंचाई जाणवत आहे. शहरात तुलनेने चांगली परिस्थिती असली तरी धरणांमधील पाणीसाठा पुढील पावसाळ्यापर्यंत जपून वापरण्याचे आव्हान आहे. नगर शहरात महानगरपालिकेने आताच पाणी कपात जाहीर केली आहे. या परिस्थितीत सर्वांनीच उपलब्ध पाणी जपून वापरणे आवश्यक आहे. यासाठीच निबंध स्पर्धेतून नगरकरांना पाणी बचतीबाबतच्या उपाययोजना शब्दबद्ध करता येतील. सध्या दसरा, दिवाळीसारख्या मोठ्या सण उत्सवांचा माहोल आहे. याकाळात साफसफाईसाठी मोठ्या प्रमाणावर पाणी वापरले जाते. हे पाणी जपून कसे वापरावे, पुढील आठ महिने पाण्याची काटकसर कशी करावी, वैयक्तिक योगदान कसे असावे, जनावरे, पक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था कशी करावी, पाण्याचा अपव्यय कसा टाळावा अशा गोष्टींचा उहापोह निबंधातून होणे अपेक्षित आहे.

निबंध सुवाच्च हस्ताक्षरात लिहिलेले आणि १ हजार शब्द मर्यादेत असावेत. प्रथम तीन विजेत्यांना आकर्षक बक्षिसे दिली जातील. स्पर्धकांनी आपले निबंध २० ऑक्टोबर पर्यंत रोहित कॉस्मेटिक, नवीपेठ किंवा वर्धमान प्लायवूड सेंटर, मुनोत इस्टेट, स्टेशन रोड, अहिल्यानगर येथे जमा करावेत, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

# ज्ञानेशकुमारांचा राजीनामा घ्या, एसआयआर रद्द करा! अहिल्यानगर शहरामध्ये 'रिपाइं'चे साखळी उपोषण सुरू

### मतदार यादीतील कथित घोळाविरोधात एल्गार; समविचारी पक्षांच्या पदाधिकाऱ्यांचाही आंदोलनात सहभाग



नगर - मतदार यादीतून नागरिकांना कथितरीत्या चुकीच्या पद्धतीने वगळून त्यांच्या मतदानाच्या घटनात्मक अधिकारावर गदा आणली जात असल्याचा आरोप करत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षाच्या वतीने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, संबंधित प्रकरणात त्यांच्यावर कठोर कारवाई करावी आणि मतदारांच्या हक्कांवर परिणाम होत असल्याचा आरोप असलेली एसआयआर प्रक्रिया रद्द करावी, या मागण्यांसाठी ९ ऑक्टोबर रोजी अहिल्यानगर शहरातील मार्केटयार्ड चौकात साखळी उपोषण सुरू करण्यात आले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर हे आंदोलन करण्यात आले. पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह विविध समविचारी पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी झाले होते. आंदोलनात रिपाइंचे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, गुलाम शेख, विजय शिरसाठ, अजीम खान, नईम शेख, विल्सन रुकडीकर, स्वप्नील साठे, राहुल ठोकळ, अझीझ शेख, शुभम दारकुंडे, जालिंदर कानडे, लकी वाघमारे, अरबाज शेख, जमीर सय्यद, जावेद शेख, आयन शेख, नजीर देशमुख, पीटर लोंढे, फयाज शेख, रईस शेख, निखिल मगर, शाम ससाणे, तौसिफ शेख, जावेद सय्यद, जफर काझी, योगेश जावळे, फारूक शेख, प्रशांत आठवले, योहान चाबुकस्वार, चिकू गायकवाड, महिला आघाडी आर पी आय ज्योती पवार, संपदा म्हस्के, मनीषा गायकवाड, विश्रांती पठारे, प्रियंका पठारे, शीतल नाटिकर, रेश्मा जाधव, प्रमिला शिरसाठ आदी सहभागी झाले होते.

या आंदोलनास शिवसेना शहरप्रमुख (उबाठा) किरण काळे, माजी नगरसेवक संजय झिंजे, आंबेडकरी चळवळीतील संजय कांबळे, बंडू आव्हाड, सुजित घंघाळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष शेखर पंचमुख यांनी उपस्थित राहून जाहीर पाठिंबा दिला.

मार्केटयार्ड चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पणाने अभिवादन करुन आंदोलनाला प्रारंभ करण्यात आले. त्यानंतर साखळी उपोषणाला सुरुवात झाली. लोकशाही व्यवस्थेत मतदानाचा अधिकार हा नागरिकांच्या सहभागाचा मूलभूत आधार असल्याचे अधोरेखित करत आंदोलकांनी मतदार यादीच्या प्रक्रियेबाबत आक्षेप नोंदवले.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केली. मतदार यादीतून नागरिकांची नावे वगळली जात असल्याच्या आरोपांची सखोल चौकशी करण्यात यावी, तसेच या प्रक्रियेमुळे पात्र मतदार मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहणार नाहीत, याची खात्री करावी, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली.

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेला (एसआयआर) विरोध दर्शवत रिपाइंच्या वतीने ही प्रक्रिया रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. मतदार यादी अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेत पात्र नागरिकांची नावे चुकीने वगळली गेल्यास त्यांच्या मतदानाच्या हक्कावर परिणाम होऊ शकतो, अशी आंदोलकांची भूमिका आहे. लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक पात्र नागरिकाला मतदानाची संधी मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे मतदार यादीतील नावांबाबत कोणतीही त्रुटी राहू नये, नागरिकांना त्यांची नावे तपासण्याची आणि आवश्यक दुरुस्ती करून घेण्याची संधी मिळावी, तसेच तक्रारींचे वेळेत निराकरण व्हावे, अशी मागणी या आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याची मागणी, त्यांच्यावर कठोर कारवाई आणि एसआयआर प्रक्रिया रद्द करण्याच्या मागण्यांसाठी आंदोलकांनी निदर्शने केली. आंदोलनात सर्व समविचारी संघटना, पक्ष व कार्यकर्त्यांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# हायड्रोपोनिक्स चारा निर्मितीसाठी शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदान द्यावे

### विनायक देशमुख यांची मागणी; केंद्रीय पथक प्रमुख डॉ.के. पोंन्नुसामी यांना निवेदन



नगर - राज्यातील आणि जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती पाहता केंद्र सरकारने पशुधन वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना हायड्रोपोनिक्स द्वारे चारा निर्मितीसाठी शंभर टक्के अनुदान द्यावे, अशी मागणी अहिल्यानगर जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य विनायक देशमुख यांनी केंद्रीय दुष्काळी पाहणी पथकाचे प्रमुख व केंद्रशासनाच्या कृषी विभागाचे संचालक डॉ.के. पोंन्नुसामी यांना दिले.

डॉ.के.पोन्नुसामी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र शासनाचे पथक अहिल्यानगर जिल्ह्याच्या दुष्काळी परिस्थिती पाहणी दौऱ्यावर आले आहे. त्यावेळी श्री.देशमुख यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात डॉ.पोन्नुसामी यांची भेट घेऊन त्यांना या विषयीचे निवेदन दिले.

या निवेदनात श्री. देशमुख यांनी म्हटले आहे, जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात दुग्धव्यवसाय करीत असुन त्या माध्यमातून त्यांना हक्काचे व खात्रीचे उत्पन्न मिळत आहे. दुष्काळाच्या काळात दुग्धव्यवसाय टिकविण्यासाठी हिरव्या चाऱ्याची उपलब्धता हा अत्यंत गंभीर विषय बनत चालला आहे. शेतकऱ्यांना जर त्यांच्या शेतातच हायड्रोपोनिक्स पद्धतीच्या माध्यमातून चारा बनविण्यासाठी प्रोत्साहन दिले तर चाऱ्याच्या बाबतीत शेतकरी स्वयंपूर्ण होतील आणि शासनालाही चारा छावण्या किंवा अन्य उपाययोजना करण्याची आवश्यकता पडणार नाही. त्यामुळे शासनाच्या खर्चातही मोठी बचत होईल.शेतकऱ्यांची जनावरे त्यांच्या गोठ्यातच ठेवून हे करता येणे शक्य आहे, त्यामुळे शेतकऱ्यांना देखील मोठा आधार मिळेल. त्याचप्रमाणे प्रशासकीय यंत्रणेवरील ताण देखील कमी होईल. या सर्व बाबींचा विचार करता केंद्र शासनाने हायड्रोपोनिक्स पद्धतीने चारा निर्माण करण्यासाठी शेतकऱ्यांना शंभर टक्के अनुदान द्यावे. आवश्यकता असल्यास शासनाने याबाबत दुष्काळी परिस्थितीच्या काळासाठी विशेष योजना तयार करावी, अशी मागणी श्री. देशमुख यांनी केली.

या बाबतचा तपशील विशद करताना श्री. देशमुख यांनी निवेदनात म्हटले आहे की, पाच दुधाळ जनावरांचे संगोपन करण्यासाठी आणि त्यांना पुरेसा चारा निर्मिती करण्यासाठी रुपये ४०,००० इतक्या अल्प किंमतीमध्ये शेतकऱ्यांना त्यांच्या शेतावरच हायड्रोपोनिक्स पद्धतीने चारा निर्मिती प्रकल्प राबविता येणार आहे. आगामी दुष्काळी परिस्थितीचा संभाव्य कालावधी लक्षात घेता आपण याबाबत केंद्र शासनाला युध्दपातळीवर कृती आराखडा करण्यास सुचवावे व योजनेची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी श्री. देशमुख यांनी डॉ. के. पोन्नुसामी यांच्याकडे केली आहे.

# गोवा सोशल एक्सलन्स ॲवॉर्डने विजय भालसिंग यांचा गौरव



नगर - स्वर कला संघ, गोवा आणि समाज कल्याण संचालनालय, गोवा सरकार यांच्या वतीने वाळकी (ता. अहिल्यानगर) येथील विजय भालसिंग यांना 'गोवा सोशल एक्सलन्स अवॉर्ड २०२६' ने गौरविण्यात आले. पणजी येथे गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास आमदार तथा गोव्याचे माजी कला, क्रीडा व संस्कृती मंत्री गोविंद गावडे, आमदार प्रेमेंद शेटे तसेच अभिनेत्री श्रुती पारकर, संस्थेचे अध्यक्ष निहाल सावंत, स्वागताध्यक्ष प्रा.डॉ. बी.एन. खरात उपस्थित होते.

विजय भालसिंग हे गेल्या दोन दशकांपासून विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रियपणे योगदान देत आहेत. वाळकी येथील रहिवासी असलेले भालसिंग एसटी बँकेची नोकरी सांभाळत सामाजिक कार्यासाठी वेळ देत आहेत. ते अनेक सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रम स्वखर्चातून राबवत आहेत. वृक्षारोपणाबरोबरच लावलेल्या झाडांचे संवर्धन करण्यावरही त्यांचा विशेष भर असतो. वाढत्या शहरीकरणामुळे आणि सिमेंटच्या जंगलामुळे निसर्गाचा समतोल बिघडत असताना पशु-पक्ष्यांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत. सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संवर्धन, पशु-पक्ष्यांप्रती असलेली संवेदनशीलता आणि ग्रामीण भागातील प्रश्नांसाठी केलेले कार्य याची दखल घेत विजय भालसिंग यांअवॉर्ड २०२६ प्रदान करण्यात आला.

# पेमराज सारडा महाविद्यालयात नवमतदार नोंदणी व जनजागृती विशेष अभियान



पेमराज सारडा महाविद्यालयात नवमतदार नोंदणी व जनजागृती विशेष अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

नगर - पेमराज सारडा महाविद्यालयात नवमतदार नोंदणी व मतदार जागृतीसाठी विशेष अभियान उत्साहात झाले. महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांनी सहभागी होत मतदार म्हणून नोंदणी करण्याबाबत माहिती जाणून घेतली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रा.डॉ.माहेश्वरी गावित यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी लोकशाहीमध्ये प्रत्येक मताचे मूल्य अनन्यसाधारण असते. देशाच्या विकासात तरुणांचा सहभाग वाढविणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे नमूद करून नवमतदार हेच देशाचे भविष्य असून त्यांच्या मनात मतदार नोंदणीविषयी आणि या प्रक्रियेविषयी जागृती झाली पाहिजे, असे विचार मांडले.

कार्यक्रमास अहिल्यानगरचे मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी व प्रांताधिकारी सुधीर पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सुधीर पाटील यांनी नवमतदारांशी संवाद साधत मतदार नोंदणीची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, तसेच मतदानाचा अधिकार व त्याचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले.१८ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक पात्र युवक-युवतीने मतदार यादीत आपले नाव नोंदवून लोकशाही बळकट करण्यासाठी आपले कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी अप्पर तहसीलदार स्वप्नील ढवळे, BLO पर्यवेक्षक प्रशांत शेलार यांची विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांच्या मतदार नोंदणी संदर्भातील अडचणी व शंकांचे निरसन करण्यात आले. महाविद्यालय प्रशासनानेही पात्र विद्यार्थ्यांची जास्तीत जास्त नोंदणी व्हावी यासाठी आवश्यक सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

या कार्यक्रमासाठी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष ॲड. अनंत फडणीस, मानद सचिव सुमतीलाल कोठारी, कार्याध्यक्ष व वरिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन अनंत देसाई, कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा यांनी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रा.डॉ.माहेश्वरी गावित, उपप्राचार्य प्रा.मिलिंद देशपांडे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. प्रकाश जाधव, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ.किरणकुमार साळवे, प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. नवमतदारांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला. सूत्रसंचालन डॉ. प्रकाश जाधव यांनी केले, तर डॉ. किरणकुमार साळवे यांनी आभार मानले

